विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : ११७**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष आठवे / अंक ६ / मे २००७


## संपादकीय

### *प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण*

शिक्षण क्षेत्रातील कित्येक विषय आजही अतिदक्षता विभागामध्ये दाखल केलेल्या रुग्णाप्रमाणे गंभीरच आहेत. सहा ते चौदा वर्षे वय असणाऱ्या देशातील प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद भारतीय राज्य घटनेच्या मार्गदशक तत्त्वांमध्ये करण्यात आलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय व राज्य स्तरांवर नेमण्यात आलेल्या प्रत्येक आयोग आणि समित्यांच्या अहवालांमध्ये देखील या विषयाबाबत काही ना काही शिफारशी असल्याचे आपल्याला आढळते. सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (१९८६) अंमलबजावणी १९९२ साली करण्यात आली. त्यातही इ.स.२००० सालापर्यंत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे उद्दिष्ट नमूद करण्यात आले होते.

परंतु सार्वत्रिकीकरणाच्या या उद्दिष्टापासून आपण अद्यापही दूरच आहोत. 'बालकांचे जीवन, संरक्षण आणि विकास' या विषयी जागतिक स्तरावर एक जाहीरनामा घोषित करण्यात आला होता. त्या जाहीरनाम्यातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने १९९० साली आखण्यात आलेल्या कृतिकार्यक्रमातही २००० सालापर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या दृष्टीने अधिक जोरकस प्रयत्नांची गरज सर्वच देशांनी करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. 'सर्वांसाठी शिक्षण' या विषयावर १९८९ साली थायलंडमध्ये झालेल्या जागतिक परिषदेत संमत केला गेलेला दहा कलमी जाहीरनामा या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे.

(पृष्ठ क्रमांक ४०वर)



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ६ / मे २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे/अंक ११ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री अरविंदांचे उत्क्रान्ति विषयक विवेचन (लेखांक दुसरा) | श्री. शं.या.मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १० |
| ३) | पं. महादेवशास्त्री जोशी - जीवनपट | | १९ |
| ४) | पाँडिचेरीचा श्री ओरोबिन्दो आश्रम | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | २३ |
| ५) | संदर्भ ग्रंथसूचीचे महत्त्व | श्री. श्रीनिवास आठल्ये | २९ |
| ६) | गीताविश्व -गीता जीवन साधना | श्रीमती आशा भिडे | ३३ |
| ७) | माणूस : काही क्षण विचारांचे | प्रा. मोहन पाठक | ३६ |
| ८) | परिसर वार्ता | | ३८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री अरविंदांचे उत्क्रान्ति विषयक विवेचन
## (लेखांक दुसरा)

*श्री अरविंदांचे उत्क्रांती विषयक विचार व त्यांचे बाबावतचे विवेचन यावरील हा दुसरा लेख* - संपादक

### उत्क्रान्तीचे सामान्य स्वरूप

सर्व विश्वात मानवच ध्येय म्हणजे काय हे समजून त्याची उपासना करु शकतो. स्वत:च्या अपूर्णत्वाची जाणिव त्यालाच असते. तोच पूर्णत्व प्राप्त करु शकतो. त्याला प्रगतीची जाणीव असते. मानवी उत्क्रान्ती तीन प्रमुख स्तरांमधून अभिव्यक्त होते. (१) तर्कपूर्व (Intrarational) (२) तर्काधिष्ठित (Rational) (३) तर्कातीत upraratíonal). पहिल्या स्तरावर मानव प्रामुख्याने वासना आणि सहज प्रवृत्तीनुसार वागत असतो. त्याचे विचार आणि कल्पना स्पष्ट नसतात. तर्काधिष्ठित अवस्थेत तो स्वत:च्या कृतीवर व विचारावर ताबा मिळवितो. या जाणिवेची परिणति हळू हळू ज्ञान चेतनेत होते.

आध्यात्मिक उत्क्रान्तीद्वारेच अंतिमत: विश्वाचे गूढ उकलले जाईल तोपर्यंत जगतातील सर्व प्रकारचा अंतर्विरोध कायम राहील. आध्यात्मिक उत्क्रान्तिद्वारे आत्मसाक्षात्कार होतो. हीच खरी अविनाशी चिरंतन सुखाची अवस्था होय! ही अवस्था निष्क्रिय नसून आनंदमय सक्रिय आहे. परंतु मानवी मन त्याची कल्पना करू शकत नाही.

आध्यात्मिक उत्क्रांतीत साधकाला आदिशक्तीच्या चरणी आत्मसमर्पण करणे आवश्यक आहे. तिचे चतुर्विध रूप - १) नितांत शांति आणि सर्वज्ञता २) सर्वशक्तिमानता ३) सौंदर्य सुसंवादिता ४) सर्वपरिपूर्णता.

### उत्क्रांतीचे साध्य -

अति मानस चेतनेच्या माध्यमातून सच्चिदानंदाचा साक्षात्कार हेच अंतिम ध्येय आहे. श्री अरविंदांच्या पूर्णयोगात या ध्येय प्राप्तीसाठी शुचितेवर भर दिलेला आहे. त्यांच्या मते पूर्ण योगाचा उद्देश सर्व प्रकारच्या दोषांचे व अकर्मण्यतेचे मूळ नष्ट करणे हा आहे. जगत् निरपेक्ष मोक्ष हा पूर्ण योगाचा उद्देश नाही. या मार्गानुसार जगताला नवीन आध्यात्मिक अर्थ प्राप्त होतो. सत्य जगत् विरहित नसल्याने ते शक्य होते. जगताच्या या सत्य स्वरूपाची जाणीव नसल्याने आपण अज्ञान व दु:खाला बळी पडतो. बाह्य जगताचे केवळ बौध्दिक ज्ञान पुरेसे नाही तर भविष्यकाळातील आध्यात्मिक साध्याची स्पष्ट जाणीव महत्त्वाची आहे. परंपरा, साचेबंद आचार व विचार, व्यक्तिनिष्ठा, यांतच धर्म समाविष्ट राहात आल्याचे आपल्याला इतिहास सांगतो. त्यामुळे धर्मसुधारकांना वेळोवेळी रुढी बदलातून मुक्त करण्याचे कटु कर्तव्य करावे लागते.

### उत्क्रांतीची प्रक्रिया-

जड अवस्थेत सुप्त असलेल्या ब्रह्माचा क्रमवद्ध विकास म्हणजे उत्क्रांती होय. याच दृष्टीने जडापेक्षा प्राण व प्राणापेक्षा मन श्रेष्ठ राहते. ब्रह्म श्रेष्ठतम आहे. उत्क्रांतीची परिणती ब्रह्मप्राप्तीत होते. भौतिक शास्त्रे चेतनेपेक्षा जडाला जास्त महत्त्व देतात. त्यालाच मूलाधार मानतात. त्यामुळे मानवाचे रहस्य जाणण्यास ते असमर्थ ठरले. मनाच्या अतीत आध्यात्मिक उत्क्रांतीला अतिमानस अवस्थेपर्यंत चार प्रमुख स्तरावरुन जावे लागते. १) श्रेष्ठ मन (Higher mind) २) उद्भासितमन (illumind mind)

३) साक्षात्कारीमन (Intutive) ४) अधिमानस (Over Mind).

अतिमानस अवस्था सर्वश्रेष्ठ आणि अंतिम असून तिच्या अवतरणामुळेच मानव नेहमीसाठी अज्ञान मुक्त होईल. मुख्य म्हणजे स्वत:बद्दलचे स्वत:चेच अज्ञान खऱ्या अंतर्विकासात बाधा निर्माण करीत असते. या अज्ञानामुळेच आपला विकास अवरुद्ध होतो. श्रेष्ठ स्तरावर उत्क्रांतीचे आरोहण होत असताना चेतना उत्तरोत्तर प्रगाढ होत जाते. ती प्राप्त झाली असता तिच्या शक्तीने आपले अंतर्बाह्य परिवर्तन होते. ही प्रक्रिया अतिमानस अवस्था प्राप्त होई पर्यंत चालू राहाते. अतिमानस अवस्था सर्वश्रेष्ठ अवस्था होय.

त्या दिव्य ब्रह्माचा साक्षात्कार हेच आध्यात्मिक उन्नतीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी केवळ श्रेष्ठ चेतनेची प्राप्ती पुरेशी नाही. तर तिचे जगताच्या उन्नतीसाठी जगतामध्ये अवतरण होणे आवश्यक आहे. अतिमानस चेतनेमध्येच हा सर्वात्मभाव असतो. तिचे अवतरण झाल्यास जगतात असणारे विरोध आणि संघर्ष दूर होऊन त्यामध्ये असणाऱ्या मूलभूत सुसंवादाचा प्रत्यय येईल. हाच पूर्ण योगाचा उद्देश आहे.

### आध्यात्मिक व भौतिक उत्क्रांती

भौतिक शास्त्रे जडाला प्रथम स्थान व शक्तीला दुय्यम स्थान देतात. पण ते या उलट असायला पाहिजे. भौतिक उत्क्रान्ती अंतर्विकासाचे बाह्य लक्षण आहे. खरी उत्क्रान्ती आध्यात्मिक स्वरूपाची असते. हे लक्षात घेतल्याशिवाय त्या विषयीचे प्रश्न समाधानकारक रीतीने सुटू शकणार नाहीत. भौतिक शास्त्राच्या अपूर्णतेची तीव्र जाणीव आज मानवाला होत आहे. उत्क्रांतीचा खरा आधार जीवन संघर्ष नसून परस्पर सहकार्य व सामंजस्य आहे, हे सूचित करण्यात येत आहे. कार्यकारण नियमापेक्षा एकात्मतेचा सिद्धान्त जास्त सुसंगत वाटत आहे. आध्यात्मिक उत्क्रांतीत पुनर्जन्माच्या सिध्दान्ताला महत्त्वाचे स्थान आहे. शरीराच्या मृत्युला केवळ भौतिक कारणेच असतात असे नव्हे तर आध्यात्मिक कारणेही असतात. आध्यात्मिक अंतर्विकास होण्यासाठी शरीरात बदल होणे आवश्यक असते. म्हणूनच आध्यात्मिक उत्क्रांतीत पुनर्जन्म ही एक अपरिहार्य अवस्था मानलेली आहे. वेदान्ताने आत्मानुभवामुळे जडाच्या अतीत होऊन त्याच्या सत्य स्वरूपाविषयी जी विधाने केली आहेत, ती आज हजारो वर्षानंतरही निर्विवाद रीतीने सत्य आहेत. श्रीअरविंदांच्या मते प्राचीन पौर्वात्त्य व आधुनिक पाश्चात्त्य ज्ञान यांचा समन्वय केल्यास आपल्याला उत्क्रांतीच्या स्वरूपाचे जास्त स्पष्ट व मूलभूत ज्ञान होण्यास मदत होईल.

आध्यात्मिक उत्क्रांतीसाठी मानवालाच जाणीवपूर्वक प्रयत्न करणे शक्य आहे. त्यापेक्षा कनिष्ठ स्तराना ते जमण्यासारखे नाही. मानवाच्या प्रगत चेतनेमुळेच तो इतर प्राण्यापेक्षा भिन्न व श्रेष्ठ असतो. यामुळेच त्याला स्वत:चे खरे स्वरूप जाणून अज्ञान मुक्त होता येईल. त्याच्या ठिकाणी स्वत:च्या मर्यादा उल्लंघून जाण्याचे व श्रेष्ठ आध्यात्मिक साक्षात्कार प्राप्त करण्याचे सामर्थ्य आहे. मर्यादातीत होण्याची त्याची मूळ प्रवृत्ती आहे आणि ही नेहमीच त्याच्या ठिकाणी राहील. पूर्णत्व प्राप्त होईपर्यंत तो सतत प्रयत्नशील असतो. अपूर्णत्वात त्याला समाधान मिळत नाही. मानव कोणत्याही यांत्रिक उत्क्रांतीच्या स्थिर आणि अप्रगत क्रमाच्या शोधात नाही. पृथ्वीवर दिव्य जीवनाची प्रस्थापना करणे हाच त्याचा उद्देश आहे. आध्यात्मिक उत्क्रांतीचा अर्थ व वैशिष्ट्य तोच समजू शकतो. तोच त्यासाठी जाणीवपूर्वक सतत प्रयत्न करतो त्यालाच स्वत:च्या दोषांची जाणीव असून ते दूर करण्याची तळमळ आहे.

### आध्यात्मिक मानवाची उत्क्रांती

संपूर्ण समाजाचे परिवर्तन आध्यात्मिक चेतनेद्वारे होणे

आवश्यक आहे. तरच पृथ्वीवर संघर्षमुक्त सुसंवादी जीवन शक्य होईल. आत्म्याच्या साक्षात्काराचे वैशिष्ट्य न समजल्यामुळेच मानव समाज ध्येयहीन व निष्फळ जीवन व्यतीत करीत आलेला आहे. त्यामुळेच तो या दैवी सत्यापासून वंचित झालेला आहे. या दृष्टीने विचार करता पाश्चात्य समाजापेक्षा भारतीय समाज पद्धती जास्त योग्य आहे. तिचा आधार जास्त सुदृढ आहे. तिचा दृष्टिकोन सर्वसंग्राह्य आहे. त्यात बुद्धीला उत्तेजन देऊन आध्यात्मिक विकासासाठी तिचा उपयोग करुन घेण्यात आलेला आहे. म्हणूनच पाश्चात्य पध्दतीप्रमाणे भारतीय जीवन पद्धतीत बुद्धी व आध्यात्म यामध्ये विरोध निर्माण झालेला नाही. त्यामुळे पाश्चात्यांची प्रगती भौतिक व मानसिक बाह्यीपर्यंत मर्यादित राहिली व आध्यात्मिक प्रेरणा क्रमश: नाश पावली.

### त्रिविध परिवर्तन -

परिपूर्ण आमूलाग्र व नि:शेष परिवर्तनासाठी अतिमानसिक परिवर्तन खात्रीदायक आहे. केवळ मानसिक आणि आध्यात्मिक परिवर्तनामुळे मानवाचे अंर्तबाह्य रूपांतर होणे शक्य नसते. त्याच्यामुळे मदत होत असली, तरी ते पुरेसे नसते. या त्रिविध परिवर्तनातील फरक स्पष्ट करताना श्री अरविंद म्हणतात - मानसिक परिवर्तनामुळे आपल्या वर्तमान स्वभावात बदल होतो. आध्यात्मिक परिवर्तनात ब्रह्माच्या दिव्य व श्रेष्ठ शक्ती - प्रकाश, ज्ञान, आनंद इत्यादी आपल्या अचेतन स्तरापर्यंत अवरोहित होतात. अतिमानसिक परिवर्तन दोन प्रकारचे असते. प्रथमत: आरोहणाद्वारे (Ascend) अतिमानसिक चेतना प्राप्त करतो नंतर ती चेतना आपल्या ठिकाणी पूर्णांशाने अवतरित (Decend) होते. त्यामुळे आपले संपूर्ण व आमूलाग्र परिवर्तन होते. मन आणि अतिमानस यांमधील अंतर नाहीसे करण्यासाठी त्रिविध परिवर्तन होणे आवश्यक आहे. भूतकाळात असा प्रयत्न निष्फळ का ठरला हे विशद करताना ते म्हणतात - प्राचीनांनी मानवाचे परिवर्तन जादूसारखे तत्काळ करण्याचा प्रयत्न केला. हे शक्य असले तरी चिरकाल टिकणारे नव्हते. त्यामुळे मानवांच्या भौतिक जीवनात कोणतेच परिवर्तन झाले नाही. मानवाची आध्यात्मिक उन्नती होण्याच्या दृष्टीने काहीच उपयोग झाला नाही. उत्क्रांतीच्या क्रमबद्धतेकडे त्यांनी दुर्लक्ष केले हे त्यांच्या अपयशाचे कारण आहे.

ईश्वराला शरण जाणे, हाच सर्वश्रेष्ठ प्रभावी सद्‌गुण आहे. उत्क्रांतीमागील त्याची उपयुक्तता सिद्ध होते. वासनाजय व आत्मशुद्धी महत्त्वाचे आधार आहेत. तेही अपुरे आहेत. संपूर्ण शरणागती व गुरुचे मार्गदर्शन या साधनांद्वारेच आध्यात्मिक परिवर्तन शक्य आहे. परिवर्तन केवळ आपल्या प्रयत्नांमुळे होऊ शकत नाही त्यासाठी आदिशक्तीची कृपा साधकावर होणे आवश्यक आहे. तिच्या ठिकाणी आत्मसमर्पण केल्याशिवाय ते शक्य नाही. कोणत्याही साधकाच्या ठिकाणी तीन गोष्टी आवश्यक असतात. १) ध्येयाची जाणीव २) संवेदनक्षमता ३) संपूर्ण शरणागती, असे असेल तरच परिवर्तनाची प्रक्रिया जलद व प्रभावी होऊ शकेल.

### ज्ञानी पुरुष -

आध्यात्मिक उत्क्रांतीचा अंतिम उद्देश संपूर्ण मानवजात दिव्य जीवनपर व्हावी हा आहे. श्री अरविंदांच्या तत्त्वज्ञानात ज्ञानी पुरुषाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आध्यात्मिक मानवाची परिणती ज्ञानी पुरुषात होते. त्याच्या ठिकाणी ब्रह्मशक्तीचा पूर्ण अविष्कार झालेला असतो. तो स्वभावत:च इतरांचे मार्गदर्शन करतो. तो समाजात आनंद, सुसंवाद शांती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. एकात्मतेची त्याला निरंतर जाणीव राहात असते. तसेच समाजातही त्याविषयी जाणीव निर्माण करतो. भारतीय संस्कृतीतील ऋषींचे जीवन आध्यात्मिक मानवाचे जीवन होते. विसंगतिपूर्ण जगाच्या अतीत होऊन ते त्याची

मूलभूत सुसंगती जाणू शकत होते, म्हणूनच ते खऱ्या अर्थाने गुरुस्थानी होते.

### ज्ञानी पुरुषांचा समाज -

जगतात जेव्हा ज्ञानी पुरुषांचे प्रमाण वाढते तेव्हा अर्थातच त्यांचा एक समाज तयार होतो. तेथे चिरंतन दिव्य शांतिमय, आनंदपूर्ण जीवन हे लोक व्यतीत करतात. अज्ञानी जीवनांमार्गदर्शन करतात. त्यांच्या ठिकाणी सुख दु:ख नीती, अनीती इ. द्वंद्वे नसतात. कारण ते मानवी बुद्धीने ठरविलेल्या कल्पनांच्या अतीत असतात. ते विविधेतील एकात्मता, चलातील अचलत्व दृश्यरुपातील सत्यत्व जाणतात. म्हणूनच ते सर्व प्रकारच्या संघर्षाच्या अतीत असतात. आजचा मानवी समाज स्पष्टत:च ज्ञानी समाज नाही. भावना, वासना आणि कामना संघर्षयुक्त आहे. स्वार्थातील संघर्ष अहंकारामुळे श्रेष्ठ चेतना अभिव्यक्त होण्याच्या मार्गात अडथळे येतात. कितीही भौतिक प्रगती झाली तरी खऱ्या सुखाचा मार्ग आपल्याला सापडलेला नाही. भौतिक सुखाने चिरंतन समाधान प्राप्त होत नाही. अंतर्जीवनाच्या मार्गानेच मावाचे खरे स्वरुप कळू शकेल. ह्याचा शोध विविध धर्मांना लागलेला नाही.

### दिव्य जीवन -

श्री अरविंदांच्या पूर्णयोगाचा उद्देश मानवी आत्म्याला जगत् आणि ईश्वराशी असणाऱ्या त्याच्या अंगभूत एकात्मतेच्या आनंदाचे प्रत्यंतर पृथ्वीवरील दिव्य सामूहिक जीवनात आणून देणे, हा आहे. समाजाचा खऱ्या अर्थाने आध्यात्मिक विकास करावयाचा तर केवळ भौतिकतेवर भर देणे सोडावे लागेल. मानवाचे मूळ सत्यस्वरुप ओळखल्यासच मानव समाज विकसित होऊ शकेल. दिव्य जीवनाचे अधिष्ठान अहंकार नसून आत्मा राहील. व आध्यात्मिक समाज आत्मविकासाला उत्तेजन देईल. आध्यात्मिक जीवनात अंतर्विकास ही मूळ बाब आहे. दुष्टमार्ग शक्तीच्या पाशातून मुक्त होणे व अहंकार युक्त जीवनाचा त्याग करणे आवश्यक आहे. त्याशिवाय दिव्य जीवन व्यतीत करता येणार नाही. आपल्या शरीराचा खरा स्वामी आत्मा आहे. हे समजल्यास दिव्य जीवनाचा अर्थ समजेल. पृथ्वीवर दिव्य जीवनाची प्रस्थापना अपरिहार्य आहे. उत्क्रांतीच्या प्रक्रियेची ती अंतिम परिणति आहे. एकात्म ज्ञान हा दिव्य जीवनाचा आधार आहे. मात्र ती यांत्रिक स्वरूपाची असू नये. ती स्वयंभू असावी. श्रीअरविंदांच्या मते दिव्य सत्याची उपासना करणे हाच प्रामाणिकपणा होय. आदिशक्तीला पूर्णत: शरण जाणे. सर्व वैयक्तिक इच्छांचा त्याग करणे, अहंकार विरहित वृत्तीने हे सारे करणे - दिव्य जीवनाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. उन्नतीचे खरे रहस्य न समजल्यामुळेच मोठी साम्राज्ये मानवी हित साधण्यास असमर्थ ठरली. मानवतेचे प्रेम सुद्धा अपयशी ठरले. मानव समाजाचा विकास थोपवावयाचा नसेल तर, दिव्य जीवनाची प्रस्थापना अपरिहार्य आहे.

### अतिमानसाचे अवतरण-

श्रीअरविंदांच्या तत्त्वज्ञानातील पृथ्वीवरील अतिमानसांच्या अवतरणाची कल्पना अतिशय महत्त्वाची आहे. सध्या पृथ्वीवर बुद्धितत्त्व अस्तित्वात आहे त्या प्रमाणे अतिमानसतत्त्व अस्तित्वात राहील. संपूर्ण परिवर्तन व्हावयाचे असेल तर हे अवतरण भौतिक स्तरापर्यंत झाले पाहिजे. केवळ मानसिक परिवर्तन पुरेसे नाही. अतिमानस चेतनेच्या अवतरणाच्या कल्पनेचा आधार कोणताही बौद्धिक शोध नसून बुद्धीच्या अतीत असणारा त्यांचा साक्षात्कार आहे. पूर्ण योगाचा उद्देश व्यक्तीचीच नव्हे तर, संपूर्ण समाजाची चिरंतन मुक्ती हा आहे.

श्री अरविंदांचे अतिमानस विषयक ज्ञान, वेद किंवा उपनिषदावर आधारित नाही. आध्यात्मिक साधनेद्वारे त्यांना जो साक्षात्कार झाला तो वेद उपनिषदे यांतील वचनांशी सुसंगत आहे, असे त्यांना नंतर आढळून आले.

त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाला वास्तविक किंवा वस्तुनिष्ठ अद्वैत असे नाव दिलेले आहे. मायावादी अद्वैतापेक्षा ते भिन्न आहे असा त्यांचा दृष्टिकोन आहे. पृथ्वीवर दिव्य जीव प्रस्थापना करण्याच्या दृष्टिने अतिमानसाचे अवतरण लवकर व्हावे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते.

श्री अरविंदाश्रमातील श्री माताजींच्या ठिकाणी १९५६ साली त्या अतिमानसिक शक्तीचे अवतरण झाले. तो विश्वाच्या इतिहासातला महान क्षण समजला पाहिजे. या वरून श्री अरविंदाना अभिप्रेत असलेले दिव्य जीवन एखादे स्वप्न राहिलेले नसून ते प्रत्यक्षत: साकार होत आहे असे म्हणता येईल.

श्री अरविंदाच्या आध्यात्मिक उत्क्रांतीविषयक सिध्दांताने ह्या संबंधीच्या विचारात भर पडलेली आहे. सहेतुक, क्रमबद्ध व अखंड असा आध्यात्मिक उत्क्रांतीचा दृष्टिकोन त्यांनी मांडलेला आहे. उत्क्रांती अंतर्निहित ब्रह्माची सुसंगत अभिव्यक्ती असल्यामुळे आधुनिक उत्क्रांती वादातील अनेक समस्यांचा आपोआप निरास झालेला आहे. या वैश्विक प्रक्रियेचा हेतू मानवाची आध्यात्मिक प्रगती हा असून तो उत्क्रांतीच्या आरंभी अस्तित्वात होता. पशूंची उत्क्रांती देखील त्यांच्या पूर्णता प्राप्त करण्याच्या इच्छेतूनच होत असते. उत्क्रांतीच्या मुळाशी ब्रह्म आहे. जीवाचा विकास आणि पूर्णता हा सृष्टी प्रक्रियेचा हेतू आहे. जीवशास्त्रातील अनेक समस्यांचे समाधानकारक उत्तर भौतिक उत्क्रान्तीवाद देऊ शकत नाही. जीवत्वाची अभिव्यक्ती अजून न उलगडलेले गूढ आहे.

उत्क्रांतीच्या प्रक्रियेचे मूळ केवळ भौतिक नाही. तसेच, मानवी बुद्धी विश्वातील सर्व प्रश्न सोडविण्यास समर्थ आहे हा भ्रम आहे. जोपर्यंत मानवाला आत्मसाक्षात्कार होत नाही. तोपर्यंत त्यांनी मिळविलेले ज्ञान अपूर्णच राहील. विश्वाचे कोडे उलगडण्यापूर्वी त्याला प्रथम स्वत:चे ज्ञान मिळवावे लागेल. जडावस्था, जीव, मन, बुद्धी या उत्क्रांतीतील अवस्था असल्या पाहिजेत. मानवामध्ये सुप्त शक्ती भविष्यात होईल. श्री अरविंदानी हेच सांगितले आहे. मानव मूलत: ब्रह्मरूप असून आध्यात्मिक उत्क्रांतीद्वारे अंतिमत: पृथ्वीवर दिव्य जीवनाची प्रस्थापना झाल्यानंतर तो त्याचा चिरंतन व समष्टीरुप घटक होईल.

जीवनातील सर्व प्रश्न बुद्धी सोडवू शकेल असे म्हणता येणार नाही. बुध्दीला मर्यादा आहेत. जीवनाचे रहस्य उलगडण्यास बुध्दी असमर्थ ठरते. भारताला हा दृष्टिकोन नवीन नाही. उत्क्रांतीचे स्वरुप मूलत: आंतरिक आहे. शास्त्रज्ञांना अजूनही जीवाच्या उत्पत्तीचा शोध लागलेला नाही. परंतु अद्याप पाश्चात्य विचारसरणी भौतिक व मानसिक मर्यादांतून मुक्त झालेली दिसत नाही. पौर्वात्य विचारसरणीने स्थूलमानाने आध्यात्मिक सत्याची उपलब्धी हे जीवनाचे ध्येय मानलेले आहे. केवळ भौतिक उत्क्रांती परिपूर्ण मानलेली नाही. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी भौतिक उत्क्रांती विवरण करणे हा त्यांचा हेतू नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांचा उद्देश तर्कातीत आध्यात्मिक सत्याचे विवरण करणे हा होता. सांख्यानी केलेल्या विवरणाचा उद्देश मोक्ष प्राप्ती हाच होय. विविध दु:खापासून मुक्ती मिळावी यासाठी त्यांनी हा प्रयास केला. भौतिक विषयक उत्क्रांती प्रक्रियेचा विचार भारतातील कणाद व सुश्रुत आदि मंडळींनी केलेला आहे. परंतु भारताचा मुख्य उद्देश आध्यात्मिक सत्यप्राप्ती हाच आहे.

वस्तुत: मानवाच्या उत्क्रान्तीची कल्पना नवीन नाही. तंत्रशास्त्रात या प्रक्रियेचे वर्णन आढळते. विशेषत: काश्मीर शैव संप्रदायात याची विशेष माहिती दिसते. सांख्यांची उत्क्रांती मुख्यत: मनोकायिक (Psycho-Physical) स्वरूपाची आहे. त्यापुढील पुरुषाच्या उत्क्रांतीचे वर्णन काश्मीर शैव संप्रदायात सापडते. श्री अरविंदानी आपला पूर्णयोग पूर्णत: नवीन आहे असे कधीही म्हटले नाही. पण प्राचीन योग पंथाचा समन्वय करुन पूर्ण योगाद्वारे

पृथ्वीवरच दिव्य जीवन प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न अभूतपूर्व आहे. मुक्त मानव समाजनिष्ठ राहील व्यक्तिनिष्ठ राहणार नाही. ही कल्पना देखील प्राचीन ग्रंथात असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. परंतु या कल्पनेचा उपयोग मात्र केवळ व्यक्तिगत साक्षात्कारासाठी झाला. सामाजिक दृष्टीने तो व्हावयास हवा होता तसा तो झाला नाही. श्री अरविंदांच्या मते आधिमानस व अतिमानस यामध्ये फरक केला न केल्यामुळे भारतीय तत्त्ववेत्यांना मायेविषयी संभ्रम निर्माण झाला. आधिमानसालाच त्यांनी श्रेष्ठतम शक्ती मानली. आध्यात्मिक प्रगती त्यामुळे रोखली गेली व परिवर्तनाचे खरे रहस्य ते जाणू शकले नाहीत.

श्री अरविंदानी हा विषय कुशलतेने हाताळला. ते केवळ बौद्धिक तत्त्वज्ञ नव्हते. तर आध्यात्मिक सिद्ध देखील होते. त्यांनी केलेले कार्य दोन्ही दृष्टीने अधिकृत आहे. आधुनिक काळातील ते श्रेष्ठ दर्जाचे तत्त्वचिंतक आहेत. त्यांच्या लिखाणातून विचारांची सखोलता, विषयावरील प्रभुत्व स्पष्ट होते. भिन्न मार्गांचा समन्वय साधण्याच्या प्रयत्नांतूनच त्यांचे तत्त्वज्ञान साकार झाले आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा मानव समाजावर फार दूरगामी परिणाम होऊ शकेल. त्यांनी विचारांतील यांत्रिकता व व्यक्तिवादी दृष्टी यातील उणेपणा जाणून तो दूर केला. आणि आपला समन्वयात्मक दृष्टिकोन मांडला. अतिमानसाच्या अवतरणाचा सिध्दांत वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचे विचार केवळ सैध्दांतिक स्वरूपाचे नसून व्यवहार्यही आहेत. मानवी समाजाचे साफल्य पृथ्वीवरच निरंतर एकात्म, दिव्य जीवनाची प्रचीती घेणे यातच सामावलेले आहे. हेच त्यांच्या आध्यात्मिक उत्क्रांतीचे अंतिम उद्दिष्ट आहे. दिव्य जीवनाच्या शक्यतेमुळे संघर्षरत व दु:ख मग्न मानवाला आशेचा नवीन किरण प्राप्त झालेला आहे.

श्री अरविंद मानवी तर्कबद्ध विचारवंत नसून तर्कातीत सत्य द्रष्टे तत्त्वज्ञ आहेत हे लक्षात येईल. तत्त्वज्ञान म्हणजे कोणत्याही तऱ्हेचा बौद्धिक विलास नसून आपण स्वत: आणि आपल्या भोवतालचे विश्व या संबंधीचे गूढ उकलण्याबाबत अंत:करणाची जी स्वाभाविक जिज्ञासा तिचीच परिणती होय. श्री अरविंदांच्या मते ब्रह्म हेच अंतिम सत्य होय. या शुध्द निरपेक्ष अंतिम सत्याचे ईश्वर जगत् आणि जीव हे तीन चिरंतन, अंगभूत घटक आहेत. जीव हा त्या सत्याचाच एक सनातन व शाश्वत अंश आहे. जेव्हा मानव या वासनामय बाह्य चेतनेच्या अतीत होतो तेव्हाच त्याला त्याच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान होते.

सच्चिदानंद हेच ब्रह्म असून माया ही सर्वश्रेष्ठ वैश्विक चेतना व शक्ती आहे. ती अनंत आहे श्री अरविंदांच्या मते अधिमानस (Over mind) अतिमानस (Super mind) आणि सच्चिदानंद हे अंतिम सत्याचे अंगभूत अंश आहेत. अतिमानस ही सर्वांत श्रेष्ठ आध्यात्मिक चेतना होय. ते ब्रह्म नसून त्याचे प्रतिनिधिक दर्शन घडविणारे असते. सच्चिदानंद व जगत् यातील दुवा असते. अधिमानस ही मन व अतिमानस या मधील अवस्था आहे अतिमानस म्हणजेच ईश्वर. ते परमोच्च सत्य आहे. तो सार्वजनिक सर्वज्ञ व सर्व सत्ताधारी आहे. तो तर्कातीत असून आत्मसमर्पणानेच वश होतो. मोक्ष मार्गातील अडथळे दूर करतो. मोक्ष हे आध्यात्मिक उत्क्रांतीचे साध्य होय. मोक्षप्राप्ती हेच मानवाचे अंतिम उद्दिष्ट. ते आध्यात्मिक उत्क्रांतीमुळे साध्य होऊ शकते.

जडावस्था (Matter) प्राण (Life) मन (Mind) श्रेष्ठमन (Higher mind) अधिमानस (Over mind) अतिमानस (Super mind) शिवाय उद्भासितमन (Mind) साक्षीभूत मन (Intertive mind) या उत्क्रांत मार्गातील महत्वाच्या पायऱ्या आहेत. श्रेष्ठ चेतनेची प्राप्ती म्हणजे कनिष्ठ चेतनेचा विनाश नसून, योग्य असा बदल होय. वेगवेगळ्या अवस्था एकमेकांशी सुसंवादित्वाने निगडित आहेत. मानवाचे सत्य स्वरूप जाणून घेण्याच्या

बाबतीत आधुनिक विज्ञान आणि मानसशास्त्र असमर्थ ठरले आहे.

श्री अरविंदांच्या मते पृथ्वीवर दिव्य जीवन प्रस्थापित झाल्याशिवाय मानवाचे प्रश्न सर्वांशाने सुटणारे नाहीत. ते केवळ अति मानसाच्या अवतरणामुळेच शक्य होईल. मानवाने या दिशेने प्रयत्न करावयास पाहिजेत. हे दिव्य जीवन एकात्म ज्ञानावर आधारलेले असेल. याचे ज्ञान झाल्यास मानव कायमचा दुःख मुक्त होईल. आध्यात्मिक साक्षात्कार हा या सिद्धांताचा मूळ आधार आहे. श्रीअरविंद व्यक्तिगत मुक्तीचा पुरस्कार करीत नाहीत कारण व्यक्तीला समाज व ईश्वर निरपेक्ष स्थान नाही. हे तीनही परस्परांचे अंशभूत चिरंतन अंश आहेत. अतिमानसाच्या पृथ्वीवरील अवतरणामुळे हे एकात्म मूलभूत ज्ञान प्राप्त होण्याला मदत होईल. त्याने अज्ञान कायमचे दूर होऊन कालांतराने दिव्य समाज पृथ्वीवर प्रस्थापित होईल. आणि मानव समाज सर्व प्रकारच्या दुःखातून कायमचा मुक्त होईल.

**श्री. शं.बा.मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

पुराणात ग्रंथ एकूण अठरा, सगुण अवतारांच्या महात्म्यावरोबर पुराणे वाढली विष्णुचे दहा अवतार कथा, शिवाच्या लीलांचा प्रभाव पुराणांनी लोकप्रिय केल्या. त्यांची नावे अशी १ ब्रह्म, २. पद्म ३. विष्णु, ४. शिव, ५. भागवत, ६. नारद ७. मार्कंडेय, ८. अग्नि, ९.भविष्य, १०. ब्रम्हवैवर्त, ११. लिंग, १२. वराह, १३. स्कंद, १४. वामन, १५. कूर्म, १६. मत्स्य, १७. गरुड, १८. ब्रम्हाण्ड. पुराण श्रवण रावापासून रंकापर्यंत नित्याच्या धार्मिक विधि म्हणून केले जाते. प्राचीन राजे, वंशावळी, काळगणना, सृष्टी निर्मिती, भगवंताचे विविध अवतार, त्यांचे कार्य, प्रलय, भूगोल, खगोल, यांचे विस्तृत वर्णन पुराणातून आले आहे.

भारतीय धर्म, संस्कृती, मोक्ष साधन, यांच्या विकासाच पुराणाचे मोठे साहाय झाले. सकाम व्रते ऐहिक अभिवृद्धीची लालसा पुराणमुळे झाली, अवैदिकांच्या लाटेखाली हिंदुधर्म खिळखिळा होण्यापासून पुराणामुळे वाचला. वेदांतील विचार, कर्म, उपासना, इत्यादी लोकाभिमुख केली. उपनिषदातील सत्य ज्ञान अनंत परब्रम्ह पुराणातून सगुण सालंकृत पतितपावन अशा रूपात उभे राहिले. वर्ण-बाह्यांना पुराणा नी भक्तीच्या साधनेत आणले, पुराणांनी - प्रवृत्ती, निवृत्ती, यती, ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, स्त्री, शुद्र, संकर जाती व त्रैवर्णिक या सर्वांना उपयुक्त धर्म सांगितले.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*भारतीय तत्त्वज्ञानातील मानवी अस्तित्वाचा शोध घेताना कलोपनिषदांचा संदर्भ जसा अपरिहार्य आहे तसाच कर्नाड यांच्या हयवदनचा कॅनव्हास वापरला तर...- संपादक*

## Traditinal Indology

आल्मेडा लायब्ररी, माध्यमिक शिक्षणोत्तर मंडळ, ठाणे या संस्थेचे माझे मित्र श्री. कुमार चौबळ यांनी 'Indology' ह्या विषयावर मला एक लेख पाठवण्यासाठी विनंती केली. मी जेव्हा 'इंडॉलोजी' ह्या नावाने जी माहिती उपलब्ध आहे, त्याचा शोध घेतला, तेव्हा जाणवले की, ह्या सर्व माहितीचा दर्जा हा 'एका कोरडा गोळा बेरीजेच्या संग्रह नीतीचाच' एक उपद्व्याप दिसतो व असा माझा समज दृढ झाला. परकीयांनी आपल्या संस्कृतीच्या चष्म्यातून दुसऱ्या संस्कृतीचे तिऱ्हाईत भावनेने घेतलेले दर्शन असे त्याचे वर्णन करता येईल. त्यांत संस्कृतीचे हृदय सापडत नाही. जाणले जात नाही.

## हयवदन

मग, मी माझ्या त्या लेखात 'हयवदन' ह्या डॉ. गिरीश कर्नाड या लेखकाचा अत्यंत अभावितपणे उल्लेख केला. भारतीय साहित्यांतील एक दर्शन म्हणून !

## डॉ. गिरीश कर्नाड

'हयवदन' हे नाटक गिरीश कर्नाड यांनी 'कानडी' भाषेत प्रथम लिहिले व नंतर त्यांचे होमी भाभा फेलोशिपच्या मदतीने इंग्रजीत रुपांतर केले गेले.

डॉ. गिरीश कर्नाड यांचा जन्म १९३८ला माथेरान, महाराष्ट्र येथे झाला. ते 'ऱ्होडस् स्कॉलर, ऑक्सफोर्ड व होमीभाभा फेलो' झाले. 'मंथन' सारखे त्यांनी चित्रपट दिग्दर्शन केले व अनेक चित्रपटांत कामही केले. फिल्म आणि टेलीव्हिजन इंस्टिट्यूट, इंडिया चे डायरेक्टर व संगीत नाटक अॅकेडेमी (India's National Academy of the Performing Arts) ह्या संस्थेचे चेअरमन होते.



डॉ. गिरीश कर्नाड

## आध्यात्मिक चित्रपट

'दिशाच्या मागील अंकात मी 'बोर्न आयडेंटिटी' व 'मॅट्रिक्स' ह्या दोन हॉलीवुडच्या चित्रपटांचा उल्लेख केला होता. चित्रपटांच्या माध्यमातूनही फिलॉसॉफी (तत्वज्ञान विषयापर्यंत प्रेक्षकाला खेचण्याचे व त्यांतून मनोरंजन सुद्धा साधण्याचे कसे प्रयत्न होतात यांची काही उदाहरणे म्हणून चर्चा केली. आपल्याकडे 'गाईड', 'स्वामी' असेही काही चित्रपट आले की त्यात एक आध्यत्मिक उंची गाठण्याचा

प्रयत्न केला आहे.

## खरी भारतीयता

भारतातल्या तत्वज्ञानाचा विशेष म्हणजे त्यात असलेल्या 'स्पिरीच्युअल' आध्यात्मिक विचार. तेव्हा 'भारतातील, संस्कृती, इतिहास, नैतिक मूल्ये, कला, साहित्य वगैरेचा विचार व अभ्यास करण्याचे माध्यम म्हणजे 'Indology' होय.

पण, ह्या शास्त्राचा आत्मा पकडण्यासाठी विशेष कर्तृत्व लागते. शिवाय. तत्त्वज्ञानाच्या गहन विचारांचा प्रत्ययकारी अनुभव देणारी कला, साहित्य, काव्य निर्माण करण्याची क्षमता आजकालच्या फारच थोड्या भारतीय साहित्यिकांनी कमावलेली आढळेल.

पण, डॉ. गिरिश कर्नाड यांच्याकडे ही सामर्थ्ये आहेत याचा परिचय होईल. 'हयवदन' ह्याचा अर्थ घोड्याचा चेहरा. 'स्फिंक्स' ह्या इजिप्तमधील शिल्पाचा जसा 'अर्ध पशू व अर्ध मानव' असा प्रत्यय त्याच्या रुपात व्यक्त झालेला सापडतो, तसाच प्रकार!! ह्यामध्ये गार्भितार्थ हा की सिंहाच्या धडावर मानवी मुख, हे जसे इजिप्तमधील शिल्प दाखवते, तसे मानवी धडावर 'घोडा म्हणजे अश्व' ह्याचे शिर दर्शवणे. हेच 'हयवदन'.



Haya Vadan - Dr. Girish Karnad

## पुराण कथा व थॉमस मान

ही मूळ गोष्ट 'कथासरित्सागर' ह्या जुन्या संस्कृत भाषेतील कथासरित्सागर सापडते. आश्चर्य म्हणजे थॉमस मान ह्या पाश्चात्य लेखकाने त्यावर 'Transposed Heads' असे नाट्य रुपांतर केले.

संस्कृत मूळ कथेत एक भूत हे एका धाडशी राजाला ही गोष्ट सांगते. त्या कथेत एक नैतिक विषय हाताळला आहे. पण, 'थॉमस मानच्या' रुपांतरात ह्या नाट्याचा उपयोग शरीर व आत्मा ह्या दोघांच्या यांत्रिक संबंधाची चेष्टा करण्यात खर्ची केला आहे. एवढेच नव्हे तर भारताच्या दार्शनिक शास्त्रात शीर्ष (डोके - ज्ञानेंद्रियांचा समूह) हे धड किंवा शरीर ह्यापेक्षा श्रेष्ठ असते ह्या वचनाची टिंगल करण्यात थॉमसने ही कथा राबवली आहे.

मग, डॉ. गिरिश कर्नाड यांनी नाटकाचे कथानक कोणत्या अंगाने रंगविले आहे हे बघणे फारच मनोरंजक ठरेल व आध्यत्मिक विषयांची ओळख व अभ्यास करण्यास प्रवृत्त करील.

## शरीर व मन आणि आत्मा

हा नाटकांतील मूळ आशयाचा शोध प्रत्यक्ष नाटक पहांताना होणे, हे परम भाग्यच म्हणावे लागेल. पण, ह्या लेखांत त्यांतील काही संवाद दाखवून त्याचा थोडासा प्रत्यय देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

थॉमस मान याचे म्हणणे असे की प्रत्यक्ष डोक्यांची अदलाबदल केली तरी शरीर किंवा धड यांचे मेंदू किंवा कॉशसनेसवर होणारा नैसर्गिक, मानसिक परिणाम टाळता येणार नाही किंवा हे अशक्यप्रायच आहे असे हे नाते आहे. त्यामुळे 'डोक्याच्या' श्रेष्ठत्वाची दार्शनिकांची गप्पा ही टिंगलीच्या योग्यतेची आहे.

हे सांगण्यासाठी मूळ कथेतील घटना फारच

कल्पनारम्य आहेत. एका तरूण स्त्रीचा नवरा व प्रियकर कालीमातेपाशी वेगवेगळ्या प्रसंगी स्वतःची शिरकमले प्रेयसीच्या प्राप्तीसाठी पूजा म्हणून अर्पण करतात. पण, ही स्त्री सुद्धा दुःखाने जेव्हां स्वतःच्या प्राण त्यागाला सिद्ध होते, तेव्हा ही देवता तिला आशीर्वाद देऊन त्या शिरकमलांना ह्या दोघांच्या धडावर लावण्यास व त्यांना जिवंत करण्यास प्रवृत्त करते. पण दैवदुर्विलासाने एकाचे धड तर दुसऱ्याचे शिर अशी गल्लत होऊन जगावेगळा अलौकिक प्रश्न निर्माण होतो.

ह्या विलक्षण प्रसंगामुळे घडणाऱ्या नाट्याचा तीन प्रकारांनी केलेला वैचारिक व भावनात्मक गोंधळाचा विलास हाच ह्या नाट्यमय जीवनांतील संघर्ष व विषय होय.

## भारतीय कॅनव्हास

हा विषय कसा रंगतो हे पहाणे भारतीय संस्कृतीतील दार्शनिक विचारांच्या पायावर असलेल्या विश्वास व समजुती, व शक्ती अश्या भेदांवर, शरीर व धड, नवरा व प्रियकर, विवाह संबंध व विवाहबाह्य संबंध ह्यामध्ये अडकलेले तीन जीव ह्या कॅनव्हासवर पहाणे, हा नाटकाचा प्रमुख हेतू होय. ज्याप्रमाणे 'सायन्स फिक्शन' हे वैज्ञानिक अर्धसत्यावर आधारलेल्या कथा होत, तश्या फारच थोड्या कथा, कादंबऱ्या ह्या भारतीय आध्यात्मिक (स्पिरीच्यूअल) दर्शनावर आधारलेल्या आढळतील. पण, हे नाटक पुष्कळ अंशाने हे सामर्थ्य पैदा करते. एवढेच नव्हे तर नाटकाचा उत्तरार्ध हा अर्धपुरूष, अर्धअश्व (अश्वमेध शब्दाची व यज्ञाची आठवण करून देईल) अशी कथा राष्ट्र संकल्पना ह्या विषयावर सांगितली आहे. तेही नाट्यमय प्रसंग वैचारिक खळबळ पैदा करण्याइतके रंगविले आहेत.

## मानवी त्रिकोण

ह्या हयवदन नाटकांतील तीन मुख्य पात्रे म्हणजे पद्मिनी ही एक सौंदर्यवती स्त्री, देवदत्त हा कृश पण बुद्धीमान नवरा, कपिल हा सामान्य बुद्धीचा, देवदत्त ह्याचा परम मित्र पण, अत्यंत सुदृढ, सशक्त व मदनासारखे शरीर प्राप्त असलेला असा व पद्मिनीची अभिलाषा मनात बाळगणारा पुरुष. 'भागवत' हा एक त्रयस्थ, तटस्थ व सूत्रधारासारखी भूमिका सांभाळणारे पात्र व खुद्द कालीमाता देवी ही सुद्धा नाटकांत सामील आहे.

कानडी साहित्यिकांना नवीन स्टेज व थीएटर प्राप्त करून देण्याचा मान तेथील प्रोफेशनल मंडळींनी मिळवून दिला होता ह्या पार्श्वभूमीवर ह्या नाटकांची रचना व 'प्रेझेंटेशन' करण्यात आले.



कालीमाता

## मनोगत

नाटकांत नवनव्या प्रयोगांना सुरवात झाली होती. डॉ. गिरीश कर्नाड हे आपल्या लेखकाच्या मनोगताना ह्या नूतन नाट्यप्रयोगांची ऐतिहासिक चळवळींची भूमिका मांडतात. हा भाग सुद्धा वाचण्यासारखा व अभ्यासपूर्ण

आहे. हयवदन ह्या नाटकाचा विषय समजण्याकरिता हे वाचन आवश्यक ठरावे. ते इब्राहिम अल्लकाझी ह्याच्या 'Strindlberg's Miss Julie' ह्या नाटकाच्या प्रयोगाचा गौरवाने उल्लेख करतात व त्यांतील विषयाचा व मांडणीचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम झाला तो ह्या व इतर नाटके, सिनेमा ह्या क्षेत्रांतील त्यांच्या कामगिरीवर पडला.

हा लेख काही त्यांच्या आत्मचरित्राचा भाग म्हणून लिहीला जातो आहे असे वाटेल. पण, अलकाझी या दिग्दर्शकाने जो मानवी मनाच्या खोलवर होणाऱ्या तरंगांची चित्रे रंगवण्याचा उपक्रम सुरु केला त्यावर त्यावेळची भावना कोणती होती ते कर्नाड यांच्या शब्दांत बघुया

"the very notion of laying bare the inner recesses of the human psyche like this for public consumption seemed obscene."
"मानवी मनाच्या खोलवर असणाऱ्या कंगोऱ्याचे मानसिक आंदोलनांचे वर्णन जाहीरपणे प्रक्षेकासमोर रंगवणे हे एक बीभत्सपणाचे लक्षण व गर्हणीय मानले जात होते."

'हयवदन' ह्या नाटकांत याच गोष्टींचे चित्रण असल्याने आपल्याला या प्रयोगांचा इतिहास माहीत असणे आवश्यक ठरावे.

## अर्ध व्यक्तित्व

नवरा, प्रियकर व बायको (प्रेयसी) ह्यांच्या परस्पर भावनीक संदर्भावरील हे नाट्य, एका अलौकिक युक्तीने म्हणजे माणसाचे धड व डोके यांच्या ताटातुटीने व अदलाबदलीने घडून नवरा व प्रियकर ह्यांच्या शरीर व डोके यांच्यातील बेबनाव चव्हाट्यावर येतो. तसेच, मर्यादशील अश्या ह्या सुंदर स्त्रीच्या मनातही पुरुषाच्या बुद्धी व शरीर यांच्या आकर्षणातील भेद व मानसिकतेवरील तरंग हे चव्हाट्यावर येतात. तेव्हा, मानवी फॉर्म मधील ह्या सूक्ष्म भेदांचे दर्शन व वासनांचे खरे दर्शन घडते.

**गिरीश कनार्ड ह्यांच्या शब्दात -**

"The result is confusion of Identities which reveals the ambiguous nature of Human personality"

सुरवातील देवदत्ताचे (डोके) व कपीलाचे (धड) (शरीर) (डोके+धड) असलेले हे नवीन व्यक्तित्व (दे+क) म्हणू या हे त्याच्या मूळ स्वभावापासून ( दे+दे) वेगळे वागावयाला लागते. तीच गोष्ट (क+दे) म्हणजे कपीलचे डोके व देवदत्तचे धड या शरीर ह्या नवीन व्यक्तिमत्वाची होते.




(दे + क) म्हणजे 'नूतन देवदत्त' हा कविता वगैरे करणे बंद करतो आणि (क+दे) 'नूतन कपील' ह्याला त्याच्या देवदत्ताचे शेष शरीराकडून नवीन वृत्तीबदल प्राप्त व्हावयाला लागतात.

पद्मिनीला सुरवातीला असे वाटले होते की आता तिला देवदत्तच्या बुद्धीचे जे आकर्षण होते व कपीलाच्या मदनासारख्या शरीराबद्दल जी वासना होती, या दोन्हींचा

'एकत्र स्वर्ग' प्राप्त होणार, तिला हळूहळू या अंतर्गत सरमिसळ व अंतःप्रवाहांच्या मिश्रणाने होणाऱ्या दोघांच्या व्यक्तिमत्वातील बदलामुळे 'हा स्वर्ग' ही कलुषित होतो आहे, असे वाटून भ्रमनिरास होऊ लागतो. ह्या तिघांध्ये फक्त तिलाच 'संपूर्ण एकात्म' अनुभवाची प्राप्ती होण्याचे सामर्थ्य आहे.

"of the three, only she has the capacity for complete experience"

कारण 'शास्रात' शरीराच्या डोके किंवा शीर्ष ह्या भागाला जे श्रेष्ठत्व 'उत्तमांग'म्हणून मानले जाते. त्या उत्तमांगांची व त्यांच्या मूळ धडांची अदलाबदल झालेली आहे.



Devadatta (Husband) and Kapil (Lover)
Yajna Sacrifice

आता ह्या मिक्स व्यक्तिमत्वाच्या दोन व्यक्ति म्हणजे देवदत्त व कपील ह्यांच्या डोक्याची व धडांची अदलाबदल झाल्यावर जो महाप्रश्न उभा रहातो. तो कसा सोडवला जातो? पद्मिनीचा नवरा कोणता? जुना देवदत्त? पण त्याला कपीलाचे धड चिकटलेले आहे चेहऱ्याला. कपील? नाही कारण, त्याला देवदत्ताचे धड आहे, पण उत्तमांग कपीलचे डोकेच आहे.



Padmini with Two Replaced Heads But with Transposed Heads

<u>कपील म्हणतो</u> : पद्मिनी तू देवदत्ताची पत्नी होतीस व आता देवदत्ताचे शरीर म्हणजे धड, मला प्राप्त झाले आहे. 'कनिष्ठांग'मला आहे तो देवदत्त आहे.

जेव्हा विवाह होतो तेव्हा हा 'शरीरसंबंध' म्हणला जातो. ज्या शरीराबरोबर तुझा संग होतो ते देवदत्ताचे कनिष्ठांग शरीर आता मला प्राप्त झाले आहे. ज्या हाताला धरून तुझे 'पाणीग्रहण' झाले, तो हात. देवदत्ताचा. तो आता माझा आहे. त्यामुळे, तू आता माझी बायको आहेस.

<u>देवदत्त म्हणतो</u> : पद्मिनी हा कपील अज्ञानी आहे. 'अग्निसाक्ष' जो विवाह संस्कार झाला तो 'देवदत्त' या 'पूर्णपुरुषाशी' झाला. केवळ 'धडाशी' नव्हे. मी देवदत्ताचेच उत्तमांग धारण केले आहे. शास्रामध्ये सांगितलेल्या नियमावरहुकूम तू माझी 'धर्मपत्नी' आहेस व रहाशील!!

आणि, हा गुंता काही सुटत नाही व प्रत्यक्ष वाक् युद्ध व अडवणूक सुरु होते. देवत्ताला कपील पद्मिनीला घेऊन घरी परत जाण्यास विरोध करून तो आडवा उभा रहातो. ह्यावर पद्मिनीची प्रतिक्रिया महत्त्वाची ठरावी.

**<u>पद्मिनी म्हणते</u>** : कपीला अरे इतके दिवस तू आमचा कौटुंबिक मित्र म्हणून वागलास. देवदत्त तुझा मित्र व तुला त्याच्या विद्वतेबद्दल व व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर होता. तू आता आम्हाला अडवून का छळतोस?

**<u>कपील म्हणतो</u>**: मला माहित आहे. पद्मिनी तुला देवदत्ताचे मुख, बुद्धी व कपीलाचे (माझे) पूर्वीचे धड, शरीर दोन्ही हवे आहे. अगदी हुशार आहेस!! मी ते घडू देणार नाही. अडवणारच तुम्हाला!!

## गुंत्याचा उलगडा नाही

<u>इथं नाटकाचा पहिला भाग संपतो</u>

दुसऱ्या अंकात सुरूवातच 'भागवताच्या स्वगत भाषणाने होते.

Bhagvata : What? what indeed is the solution to this problem, which holds the entire future of these unfortunate beings in balance?

(भागवत : काय उत्तर? ह्या प्रश्नाचे काय उत्तर? ह्या विचाऱ्या तीन जीवांचा हा गुंता कसा सोडवावयाचा. ह्यांचे भविष्य ह्या उत्तरावर उभे रहाणार आहे व विसावलेले दिसते आहे?)

'भागवताचा' हा प्रश्न अर्थातच प्रेक्षकांना आहे, म्हणजे तो सगळ्या मानव जातीलाच आहे. तुम्ही सगळ्या कथा, कांदबऱ्या व उदाहरणार्थ संगम सिनेमामधील राजेंद्र कुमार, राजकपूर, वैजयंतीमाला यामधील यक्षप्रश्न, मैत्री, विवाह या सामाजिक नीतिक्षेत्रांत उभा ठाकलेला, नातेसंबंधीचा शारिरीक, मानसिक पातळीवरचा व समाजाचा आचार विचार ह्या बंधांचा विचार हाच आहे ना? हा 'तिढा' कसा व कधी सुटणार?

## शास्त्रातील पुरातन उत्तर

भागवताच्या मनात अर्थातच इतिहासात हा प्रश्न कसा सोडविला होता याच शोध सुरु होतो. वेताळ व सम्राट विक्रमराजा ह्यांच्या पुढे हा प्रश्न उभा राहिला तेव्हाही त्यांनी शारआचा ऋषी मुनींनी केलेला 'शास्त्रार्थ' सांगितला.

"As the heavenly Kalpa Vriksha is supreme among trees, so is the head among human limbs. Therefore the man with Devedatta's head is indeed Devdatta and he is the rightful husband of Padmini"

ज्याप्रमाणे वृक्षामध्ये कल्पवृक्ष हा श्रेष्ठ तसा पुरूषामध्ये शीर हे श्रेष्ठ. त्यामुळे ज्या पुरूषाला देवदत्ताचे शीर प्राप्त आहे तो पद्मिनीचा नवरा.

त्यामुळे (दे+क) व पद्मिनी आनंदाने नाचू लागतात.

पद्मिनी आनंदाने म्हणते. Padmini: My celestial-bodied Gandharva .... My sun-faced Indra ....

## बहिरंग एक अंतरंग दुसरे

डॉ. गिरीश कर्नाड इथे सुद्धा आपल्या शास्त्रावर आधारलेल्या उत्तराची व पद्मिनीच्या मनाची अंतरंगातील सुप्त नीतिची छाननी करताहेत, हे बघा!! पद्मिनी म्हणते आहे देवदत्ताचे शीर व कपीलाचे धड असलेल्या कर्मांगाला की, "हे स्वर्गीय गंधर्व शरीरा .... व इंद्राच्या तेजस्वी चेहऱ्याच्या माझ्या देवदत्ता..!!!

या एका वाक्यात पद्मिनीच्या मनाची शक्ती समोरच्या मानवी देहाची स्वतःच्या मनामध्ये गंधर्व शरीरी धड व इंद्रतूल्य चेहरा किंवा मुख असे प्रेमाने करु शकते. पूर्ण व्यक्ति "Integral" म्हणजे काय हे माझ्या अंतिम चर्चेचा उद्देश आहे, पण तिकडे नंतर वळू या. सध्या डॉ. गिरीश कर्नाड यांच्या मानवी देह व मन यांच्या मधील सूक्ष्म

भेदाची विश्लेषणात्मक काल्पनिक छाननी बघु या.

कपील बरोबर एका एकांत प्रसंगी संवाद घडतात.

**कपीलः** हे तुझे मूल.

**पद्मिनी** : होय आणि तुझे ही!!

**कपील** : माझे

**पद्मिनी** : तुझ्या शरीराने मला दिलेले!!

**कपीलः** माझे? नाही माझे नाही. मी कपील आहे पद्मिनी. त्या दिवशी मी मान्य केले नाही. पण आता हळू हळू मला पटू लागले आहे.

नंतर काही वेळाने होणाऱ्या प्रसंगात

**कपील** : तुझे मूल अगदी तुझ्यासारखेच दिसते.

**पद्मिनी** : (थोडे थांबून) आणि तू? त्याच्या खांद्यावर तसाच तीळ आहे तुझ्यासारखा.

पण, कपीलची त्याच्या बदललेल्या शरीराबद्दलची - म्हणजे देवदत्ताचे धड (कनिष्ठांग किंवा नीचांग) बद्दलची स्वतःची भूमिका बदलू लागली होती.

**कपील** : जेव्हा हे नीचांग मला प्राप्त झाले, तेव्हा ते एखाद्या प्रेतासारखे माझ्या डोक्याला लटकलेले होते. काही म्हणा ते 'ब्राह्मणाचे शरीर' होते. जंगलातील जीवनाला अनुकूल, सरावलेले नव्हते.

मी साधी कुऱ्हाड उचलू शकत नव्हतो. हात व कोपरे ठणकत असत. थोडे धावूही शकत नव्हतो. मला ह्या अश्या शरीराचा काही उपयोग नव्हता. मग, तो क्षण आला व आमच्यात एक शीतयुद्धच सुरु झाले.

**पद्मिनी** : मग कोण जिंकले?

**कपीलः** मीच!!

**पद्मिनी** : शरीर नेहमीच जिंकते नाही कां?

**कपील** : नशीबाने होयच म्हणावयाचे. मी आता धावू, पोहू शकतो प्रथम प्रथम पोट बंड करावयाचे. पण, आता मी खातो ते पचावयलाच लागते त्याला म्हणूनच मी आता कपील आहे.

**पद्मिनी** : What a good mix
No more tricks
Is this one that
or that one this?

आपण हे गाणे काली मातेच्या देवळांत म्हणाले होते आठवते?

**कपील** : हो, मग?

**पद्मिनी** : काही नाही. आता, हे सर्व माझे आत्मचरित्र झाले आहे कपील व देवदत्त. कपील देवदत्ताचे शरीर घेऊन व देवदत्त कपीलाचे धड घेऊन एकंदर चार व्यक्तिमत्वांची ही रंगत विचित्रपणे प्राप्त झाली आहे. एकाच जीवनात!! कपील व पद्मिनी यांना एकत्र एकांतांत सहवासाची संधी मिळूनही शांती लाभत नाही.

**पद्मिनी म्हणते** : I neither win nor lose

(मी जिंकले नाही आणि हरले पण नाही)

**कपील म्हणतो** : आता एकत्र राहूनही काय फायदा तू (पद्मिनी) घोटाळा केलाच आहेस. मी सगळ्या स्मृती, चेहरा नसलेल्या आठवणी माझ्या शरीरांत गाडून टाकल्या होत्या. त्या तू आपल्या नख्यांनी ओरबाडून जिवंत केल्यास. मी अपूर्ण आहे.

**पद्मिनीः** कोण अपूर्ण? तू?

**कपीलः** होय मीच!! एखादा माणूस शरीराला घोटून आकार देऊ शकतो, पण स्मृती नाहीशा करू शकत नाही, गाडू शकत नाही. हे आश्चर्यकारक नव्हे कां?

शरीराला स्वतःची अशी अंगभूत भूते असावीत. स्वतःच्याच खास स्मृती असाव्यात!! स्मृती स्पर्शांच्या, बाहूमध्ये आलिंगन सुखाच्या, गरम शरीराच्या स्पर्शांच्या, स्मृती ज्या आपणच ओळखू शकत नाही, समजू शकत नाही. एवढेच नव्हे तर त्यांना नाव देखील बहाल करू शकत नाही. कारण -कारण काय तर त्या प्रत्यक्ष घडताना, अनुभवताना शरीरावर, धडावर डोकेच नसते. ह्या भीषण, अलौकिक प्रसंगांचा शेवट तसाच होतो आहे.

कपील व देवदत्त दोघेही जण शेवटी ह्या भ्रमिष्ट स्वतःचे पूर्ण अस्तित्व गमावलेल्या स्थितीत, पद्मिनी मिळूनही समाधानी राहू शकत नाहीत. एवढेच नव्हे तर एकमेकांच्या द्वेषाचे व नैसर्गिक मत्सराने भारलेल्यामूळे अस्तित्वाच्या खुणा गमावल्याने हताश व शून्यवत होऊन जातात. शेवटी ते तलवारी काढून स्वसंमत अश्या आत्मत्यागाच्या भावनेने एकमेकांचा अंत करतात. एकमेकांच्या मर्जीने!!

**भागवत** : एक गाणे म्हणतो त्यांतील दोन ओळी अश्या "The rishi who said 'knowledge gives rise to forgiveness' had no knowledge of dealth."

जो ऋषी असे म्हणाला की "ज्ञानाच्या प्राप्तीमुळे क्षमावृत्ती उद्भवते त्यालाच ज्ञान नव्हते मृत्यूचे"

## विलक्षण सती

पद्मिनी : (एक सती जाण्यासाठी मोठे अग्निकुंड रचावयाला सांगते) (तिघांना सामावणारे) "ते दोघे मत्सराने जळत होते, एकमेकांला मिठ्याही मारत होते आणि शेवटी त्यांनी मृत्यूलाही कवटाळले"

मी मात्र स्तब्ध उभी होते.

जर मी म्हणाले असते की मी तुम्हा दोघांच्या बरोबर जगायला, रहावयाला, संसार करावयाला राजी आहे. तर कदाचित दोघेही जगले असते- आताही!!

पण, मी तसे म्हणू शकत नव्हते!!

होय, नाही, कपील, नाही. देवदत्त -मला माहित आहे माझ्या रक्तातील थेंबाथेंबाला माहीत आहे की तुम्ही एकत्र राहिला नसता. तुम्हाला केवळ माझीच भागीदारी करावी लागणार नव्हती तर तुमच्या स्वतःच्या (पण परक्याच्या) शरीराचीही भागीदारी लादून घ्यावी लागणार होती.

तुम्हाला 'मृत्यू' परिचयाचा (?, माझा प्रश्न) होता म्हणून एकमेकांच्या मिठीत तुम्ही मृत्यू पत्करलात. तुम्ही जगला असतात. कदाचित, पण एकमेकांच्या आंतड्याचा कोथळा काढत, लक्तरे काढत व तुकडे तुकडे करीतच!! मला तुम्हाला मृत्यूकडे न्यावेच लागले असते. तुम्ही एकमेकांना कदाचित क्षमा केली असती -असेलच- पण, मला वेगळी टाकून.

## भारतीय पतिव्रता

भागवतः ह्याप्रमाणे पद्मिनी 'सती' झाली भारत हा पतीव्रतांचा देश आहे. स्त्रिया ह्या जन्मभर पतीसेवा करण्यात आयुष्य खर्ची करतात. पण, पण, कुठलीही पतीव्रता पद्मिनी सारखी सती गेली नाही असे म्हणले तर अतिशयोक्ती मानण्याचे कारण नाही.

आणि कुणालाही हे 'सती स्थान' स्थान माहीत नाही. एखाद्या जंगलवासियाला विचारले तर ते एका झाडाकडे बोट दाखवितात. बहर आलेल्या त्या झाडाला 'Fortunate Lady' ह्या नावाने. "त्या झाडाला मुळातून उगम पावून एक सुमधूर संगीत व गीत सगळे वातावरण सुवासाने भारून टाकते."

इथे जवळ जवळ 'हयवदन' नाटकाचा पूवार्ध पूर्णपणे

संपतो. नंतरचा अर्धभाग हा 'अश्वमेध' सारखा गूढ 'अर्ध मानव' 'अर्ध अश्व' व 'पूर्ण राष्ट्र' ह्या दुसऱ्या गूढ संकल्पनेला वाहिलेला आहे.

कदाचित कर्नाड यांचा याही दोन्ही अपूर्णतेच्या अस्तित्वाचा प्रश्न त्यांना प्रेक्षकांपुढे टाकावयाचा असेल. पण, आपल्या लेखापुरता हा पहिला अर्धभाग, अर्धसत्य एव्हढा पूर्ण, पुरा आहे.!!

ह्या पौराणिक पुरातन गोष्टीचा मोह 'थॉमस मान' ह्या जगप्रसिद्ध 'नोबेल प्राईज जिंकलेल्या लेखकाला का पडावा?

भारतीय तत्त्वज्ञानांत 'मानवी अस्तित्वाचा' जो शोध वैदिक काळांतच घेणे चालू झाले होते, त्यात 'कठोपनिषद' प्रामुख्याने हे श्रेय उपटते. त्याचाही मूळ उगम वेदातच आहे. पण शरीराला मृत्यू आहे पण आत्म्याला नाही असे ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच मृत्यूवर मात करणे होय. हे त्या वेळच्या समाजाने जाणले होते.

आता स्त्री पुरुष नाते संबंधावर पाश्चात्य जगात जे अज्ञान आहे, तसा गोंधळ वैदिक ज्ञानपद्धतीत नाही. स्त्री शरीराचे, मनाचे आकर्षण हे विश्वाच्या निर्मिती प्रसंगीच मानवी पुरुष शरीरात रचले आहे, किंवा 'अर्ध नर-नारी नटेश्वर' ही संकल्पनाच सुद्धा वैश्विक रचनेत स्त्री पुरुष युगूल हीच कल्पना दिसेल. परस्त्रीचे आकर्षण किंवा परपुरुषाचे आकर्षण हा भाव देखील विश्वनिर्मितीमध्येच सृष्टीच्या जीवन व्यवहाराचे एक सूत्र म्हणून ठेवलेले दिसते. हा भाव काय केवळ मानव जातीतच आहे? सगळ्या प्राणी जीवनात हाच भाव मूळ संकल्पनेत रूपाने सामावलेला आहे.

विवाह संस्कारात 'अग्नि' ला साक्ष ठेवून 'नातिचरामि' हे वचन घेण्याचे कारण सुद्धा एक तऱ्हेच्या अपूर्णतेची रुखरुख ही कोणत्याही भीषण मार्गाकडे न नेता. कुठल्याही एखाद्या 'समन्वयी' मार्गाच्या शोधात लागावी ही विश्व योजना व हेतू आहे असे जाणवेल.

आचार्य रजनीश यांच्या मते स्त्री आणि पुरुष हे जीवनभर आपल्या संकल्पनेतील 'आदर्श' जोडीदाराच्या शोधात असतात. पण, शेवटी हा जोडीदार त्यांना स्वतःच्या अंतरंगातच सांपडतो अशा तऱ्हेचे गूढात्मक सत्य चित्र काढण्याचा प्रयत्न केलेला आढळेल.!!

पण, तुम्ही म्हणाल की डॉ. गिरिश कर्नाड यांनी जो भावनात्मक 'जिग सॉ पझल' स्त्री पुरुष संबंधाचे काढले आहे, त्यांतील आनंद व मनोरंजन ह्यांचा अनुभव चघळताना, तत्त्वज्ञान सांगून तुम्ही का हिरावून घेत आहात!!

तेव्हा, येथेच थांबूया पण, ज्या परिपूर्ण मानवाचा शोध, पुरुषोत्तमाचा शोध भारतीय संस्कृतीने धुंडाळला त्याचा इतिहास व मर्म याचा पुढल्या दिशाच्या अंकात मागोवा घेऊ या!

॥ हरि ॐ ॥

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,
अग्यारी लेन, ठाणे - ४०० ६०१.
Tel. : 2536 84 50
Email : yrsane@eth.net

□□□

# पं. महादेवशास्त्री जोशी - जीवनपट

*पं.महादेव शास्त्री जोशी हे आज विसरले गेलेले नाव. त्यांचे मराठीला असलेले योगदान मोठे आहे. त्यांच्या जीवनपटाचा येथे आदरपूर्वक तपशील देत आहोत. २००६ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. - संपादक*

१९०६ : १२ जानेवारी १९०६ रोजी, आंबेडे (सत्तरी, गोवा) येथे जन्म.

संपूर्ण नाव: महादेव सीताराम जोशी

वडील सीताराम विश्वनाथ जोशी यांचे नरसोबाची वाडी येथे पटकीच्या विकाराने एप्रिल १९०६मध्ये निधन.

१९११ : गणपतीपूजन - धूळपाटीवर 'श्री गणेशाय नमः ओनामासिधम्' ही अक्षरे काढून शिक्षणास प्रारंभ, पहिला गुरू आत्या.

१९१२ : मौर्य राण्यांचे बंड. साखळीला प्रयाण. दोन महिन्यांनी आंबेड्याला पुनरागमन.

१९१३ : गाडगीळ भटजींकडून दीक्षा, ज्योतिष, छंद, निघंटु आणि अष्टाध्यायी यांचे अध्ययन व पठण.

१९१४ : मौंजीबंधन

१९१६ : विठ्ठलभट्ट भावे, आंबेडे यांच्याकडे ऋग्वेदादी शाखांचे अध्ययन. एतरेय ब्राह्मणादी पठण.

१९२१ : म्हापसे येथील जनार्दन भट्ट वझे यांची धाकटी कन्या उमा हिच्याशी विवाह.

१९२७ : सांगलीला प्रयाण, ज्योतिष पाठशाळेत प्रवेश. कौमुदी, मनोरमा, शेखर, तिथी चिंतामणी, प्राथमिक गणित, ग्रहगणित, पंचमहाकाव्यातील निवडक सर्ग, भारत-चंपूतले निवडक भाग, पाणिनींची सूत्रे, भट्टोजी दीक्षितांची वृत्ती, ग्रहलाघव, मुहूर्त मार्तंड, मुहूर्त चिंतामणी, बृहज्जातक इत्यादींचे अध्ययन

: पाठशाळेजवळच्या मोफत वाचनालयात मासिकांचे वाचन.

: वि. स. खांडेकर यांच्या 'गंगावन' या कथा वाचनाने लघुकथेची गोडी.

: सांगलीच्या नगरवाचनालयात नाव घातले.

लघुकथालेखक व्हायचा निश्चय.

: 'सद्विचार' चे दुसरे संपादक. बऱ्याच पौराणिक कथांचे हस्तलिखितासाठी लेखन.

१९२८ : 'शास्त्री' पदवी प्राप्त करून आंबेडे येथे पुनरागमन.

१९२९ : आजीचा वार्धक्याने मृत्यू.

१९३० : 'सत्तर शिक्षण प्रसारक संस्था' स्थापन ('सत्तर' शब्द तालुकावाचक) कार्यवाह: पं. महादेवशास्त्री जोशी.

: शाळेसाठी शाहीर होऊन भटकंती. 'अभिमन्यू चक्रव्यूहभेद' आणि 'जयद्रथ' या पोवाड्यांची रचना. पुस्तके छापली. पोवाडे गायनाची बिदागी आणि पुस्तकांच्या विक्रीची रकम शाळेलाच.

: दिवाळी लक्ष्मी-पूजन उत्सवात शाळेचे नाटक 'शाहिस्तेखान'. ले. वा. शि. कोल्हटकर.

: जिऊंवाईवर गावाचा बहिष्कार, बहिष्काराचा निषेध, गावच्या देसायांचा पाठिंबा

१९३० ते १९३३ : मुली लीला आणि कृष्णा यांचे जन्म

: पणजीला ज्योतिष व्यवसायानिमित्त प्रयाण व्यवसाय चालेना. मुलाचा जन्म आणि मृत्यूही. सौ. उमाला क्षयाची बाधा. सौ. उमाचा मृत्यू.

१९३४ : प्रियोळचे दत्तूभट्ट फडके यांची कन्या 'सुधा' हिच्याशी दुसरा विवाह.

१९३५ : पुण्याला प्रस्थान.

: 'चैतन्य', या राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.वासुदेव शिवराम कोल्हटकर यांच्या मासिकाच्या संपादकपदाची धुरा.

: कथा- चरित्र इत्यादींचे लेखन. पुराण-प्रवचनादी व्यवसाय.

१९३६ : 'कायदा आणि माणुसकी' मार्चच्या 'चैतन्य' मध्ये प्रकाशित.

: 'कर्ण-च्छेद' प्रसिद्ध. 'चैतन्य' च्या मे महिन्याच्या अंकात.

: सत्यकथा, ध्रुव इत्यादी इतर मासिकातूनही कथालेखन.

१९३७ : 'बालसंवर्धन' प्रकाशित. प्रकाशक-चैतन्य प्रकाशन.

: 'श्रीमदाद्यशंकाराचार्य' प्रकाशित. (चैतन्य ग्रंथमालेचे दुसरे पुस्तक)

१९३९ : कथाकार 'पं. महादेव शास्त्री जोशी' असे नाव प्रसिद्ध होऊ लागले.

: 'ज्ञानराज प्रकाशन' ची स्थापना.

: 'नवनीत रामायण' प्रसिद्ध.

: 'धावते ढग' या कथासंग्रहाची जाहिरात चैतन्याच्या फेब्रुवारीच्या अंकात, परंतु काही कारणांनी संग्रह प्रकाशित होऊ शकला नाही.

१९४१ : 'वेलविस्तार' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध, प्रकाशक-सागर साहित्य प्रकाशन, मुंबई.

१९४६ : ज्ञानराज प्रकाशनतर्फे 'महिपाल' प्रसिद्ध.

: 'धन आणि मन' कथेला 'ध्रुव'च्या कथास्पर्धेत प्रथम पारितोषिक

: 'ज्ञानेश्वर ग्रंथालय' या फिरत्या वाचनालयाची स्थापना.

१९४७ : स्वागताध्यक्ष : ४ थे गोमंतक मराठी साहित्य संमेलन, पुणे.

१९४९ : 'खडकातले पाझर' हा दुसरा कथासंग्रह प्रकाशित.

१९५० : अध्यक्ष : बृहन्महाराष्ट्र मराठी साहित्य संमेलन, ग्वाल्हेर.

१९५१ : 'मोहनवेल' प्रसिद्ध.

१९५२ : 'कल्पित आणि सत्य' प्रकाशित.

१९५३ : 'भावबळ' प्रसिद्ध.

१९५४ : 'भावबळ' ला सुवर्ण पारितोषिक, ७ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन, कारवार येथे.

: 'पर्जन्य कुण्डानि' या संस्कृत कथेला अखिल भारतीय संस्कृत कथास्पर्धेत दुसरे पारितोषिक (रु. २५०)

: ' तीर्थरूप महाराष्ट्र' ला मुंबई सरकाचे पारितोषिक.

: ' प्रतिमा' प्रसिद्ध.

<u>१९५५</u> : सौ.सुधाताईना गोव्यात म्हापसे येथे अटक.

: 'घरिची' आणि 'कथासुगंध' प्रसिद्ध.

<u>१९५७</u> : ३० एप्रिल रोजी 'भारतीय संस्कृति-कोश मंडळ' स्थापना.

: 'पुत्रवती' प्रकाशित.

: 'कल्पित आणि सत्य' ची पुणे विद्यापीठाच्या पदवी परीक्षेसाठी (मराठी) पाठ्यपुस्तक म्हणून निवड.

<u>१९५८</u> : 'कन्यादान' हा कथासंग्रह आणि 'सत्वधीर' प्रसिद्ध.

<u>१९५९</u> : सौ. सुधाताईची सुटका.

: अध्यक्ष, प्रादेशिक उपनगरीय साहित्य समेलेन, दादर, मुंबई.

<u>१९६०</u> : 'कन्यादान' चित्रपट प्रकाशित. उत्कृष्ट चित्रपट कथेचे 'फाळके ॲवार्ड मिळाले.

: 'कथाकांता' प्रकाशित.

<u>१९६१</u> : १२ जुलेच्या पानशेत प्रलयात ज्ञानराज प्रकाशनाच्या १०-१५ हजार पुस्तकांचा लगदा. प्रापंचित नुकसान.

: मानिनी (मराठी) चित्रपट प्रकाशित.

'मान-अपमान' (हिंदी) चित्रपट प्रकाशित

<u>१९६२</u> : 'भारतीय संस्कृति कोश, खं. १ ला' प्रकाशित.

<u>१९६३</u> : 'गरिबाघरची लेक' चित्रपट रजतपटावर आणि त्याला महाराष्ट्र राज्य सरकारचे उत्कृष्ट चित्रपटाचे ॲवार्ड.

<u>१९६४</u> : भारतीय संस्कृति कोश, खंड २रा प्रसिद्ध.

: 'वैशाख वणवा' चित्रपट प्रकाशित.

<u>१९६५</u> : धावरीच्या घराची वास्तुशांत, धावरीत वास्तव्यासाठी प्रस्थान.

: भारतीय संस्कृति कोश, खंड ३रा, प्रकाशित.

: 'बहुबेटी' (कन्यादानाचे हिंदी रूपांतर) प्रकाशित.

<u>१९६६</u> : 'कांचनाची निरांजने' निवडक कथासंग्रह प्रसिद्ध. पदवीपूर्व परीक्षेला पाठ्यपुस्तक म्हणून निवड (पुणे विद्यापीठासाठी)

<u>१९६७</u> : भारतीय संस्कृति कोश, खंड ४ प्रसिद्ध चित्रपट 'गृहलक्ष्मी' प्रकाशित.

<u>१९६८</u> : 'थांब लक्ष्मी कुंकू लावते' चित्रपट प्रसिद्ध.

<u>१९६९</u> : 'जिव्हाळा' चित्रपट प्रकाशित.

<u>१९७०</u> : 'धर्मकन्या' (मराठी) चित्रपट प्रसिद्ध.

<u>१९७४</u> : अध्यक्ष, साने गुरुजी कथामाला (२ वर्षांसाठी)

<u>१९७५</u> ते: भारतीय संस्कृति कोशाचे खंड ५ ते ९ प्रकाशित.

<u>१९७८</u> : 'लागेबांधे' हा कथासंग्रह १९७६ मध्ये प्रकाशित.

१९७९ : सत्कार, शारदा ज्ञानपीठम् तर्फे (पुणे) उभयतांचा, समर्पी आणि अरुंधती म्हणून.

: भारतीय संस्कृति कोश, खंड १०वा प्रसिद्ध.

१९८० : अध्यक्ष, १६ वे गोमंतक मराठी साहित्य संमलेन, डिचोली (गोवा) मार्च मध्ये.

: मॅजेस्टिक गप्पांत मुलाखत.

१९८१ : सत्कार : ७५ व्या वर्षात पदार्पण म्हणून गोवा; हिंदू असोसिएशन, मुंबई तर्फे

: 'तात्यासाहेब केळकर पुरस्कार', केसरी मराठा संस्था, पुणे तर्फे

: कन्या कृष्णा -तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर-यांचे निधन.

: चित्रपट 'अरे संसार! संसार!! प्रकाशित.

१९८३ : उद्घाटक - २४ वे मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन, के. प्रा. नरहर कुरुंदरकर नगर, मुलुंड, मुंबई.

: 'आमचा वानप्रस्थ' प्रस्थापित.

१९८४ : श्री. नानासाहेब पेशवे धार्मिक - आध्यात्मिक पुरस्कार : 'श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे आणि कोथरूड' (पुणे) यांचेतर्फे.

१९८५ : 'आत्मपुराण' प्रकाशित.

१९८६ : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाची गौरव वृत्ती (फेलोशिप).

: सत्कार -उभयतांचा (नि जावई रमेश होडारकर यांचा) गोवा मुक्ती संग्रामाचे प्रणेते म्हणून, गोवा मुक्ती रौप्य महोत्सवा निमित्ताने.

१९८७ : सत्कार - ८१ व्या वर्षात पदार्पण, साहित्य परिषद, पुणे तर्फे.

: 'दिनकर लोखंडे' पारितोषिकाचे पहिले मानकरी, बालसाहित्य जत्रा पुरस्कार, बालकुमार मराठी साहित्य संमेलन. (रू. १००१/- + मानपत्र + मानचिन्ह).

१९९० : डि. लिट्. (सन्माननीय), पुणे विद्यापीठ, पुणे.

: पुरोहित स्वामी पुरस्कार.

१९९२ : २६ ऑक्टोबर, द्वितीय पत्नी सौ. सुधाताई यांचे कर्करोगाने धायरी येथे निधन.

: १२ डिसेंबर, प्रायोपवेशन करून धायरी येथे देहत्याग.

(डॉ. सौ. शुभलक्ष्मी जोशी यांच्या कथाकार महादेवशास्त्री जोशी पुस्तकामधून साभार...)

## दिशा

**प्रकाशनास होत असलेल्या विलंबामुळे आम्ही दिलगीर आहोत.**

- संपादक

# पॉंडिचेरीचा श्री ऑरोबिन्दो आश्रम

*पाँडिचेरी येथील श्री ऑरोबिन्दो आश्रमाचा हा विशेष परिचय - संपादक*

पाँडिचेरी येथील श्री ऑरोबिन्दो आश्रम म्हणजे श्री अरविंदांच्या व माताजींच्या कल्पनांचे, आदर्शांचे आणि विचारांच एक अत्यंत नैसर्गिक आणि वृद्धिंगत होणारे मूर्त स्वरूप.




चित्र नं. १

आश्रम म्हटलं की, आपल्या डोळ्यासमोर सर्वसामान्यांच्या वस्तीपासून दूर कुठे तरी एकांतात असणारा, बंदिस्त आवारातला एखादा मठ येतो. भगवी वस्त्र धारण केलेले आणि जपजाप्यामध्ये मग्न असणारे संन्यासी दिसू लागतात. नित्यनेमाने चालणाऱ्या पूजा, अर्चा, होम-हवन, कीर्तन, प्रवचन आणि भजनाचा गजर अथवा वेदमंत्राचा घोष हे सारं दिसू लागतं. सर्वसामान्यांनी तिथं जायचं ते आपल्या ऐहिक जीवनात सुख, समृध्दी प्राप्त व्हावी, अथवा आपल्या अडीअडचणी व प्रासंगिक दुःखं यांचे निवारण व्हावे. म्हणून, तेथील मठाधिपती आणि इतर योगीजनांचा आशीर्वाद घेण्यासाठी आणि अशा प्रकारच्या संस्कारांनी युक्त असलेला माणूस जेव्हा पाँडिचेरीस ऑरोबिन्दो आश्रमाच्या परिसरात पोहोचतो तेव्हा तो काहीसा गोंधळून जातो. कारण त्याच्या कल्पनेतला आश्रम त्याला कुठेच दिसत नाही. लेंगा-सदऱ्यासारखा आश्रम पोशाख घालून काम करणारा एखादा विक्रेता, महाविद्यालात शिकवणारा एखादा प्राध्यापक अथवा एप्रन घालून काम करणारा एखादा तंत्रज्ञ हे सारे "पूर्ण योगाचे साधक आहेत", असं समजलं की त्या नवख्या माणसाच मन गोंधळून जातं.

असा हा आगळावेगळा पाँडिचेरीचा श्री ऑरोबिन्दो आश्रम. वेद काळातील विचारांशी नाते जोडणारा आणि तरीही २१व्या शतकांतील आधुनिकतेचे भान राखणारा. मुळात वेदकाळी तरी आश्रमाची संकल्पना कोणती होती? आश्रम म्हणजे ऋषितुल्य गुरुचं घर. कुमारवयापासून तरुण वयाची मुलं आणि मुली ज्ञानसंपादनासाठी गुरुगृही येऊन राहत. सर्वजण एका मोठ्या कुटुंबाचे घटक म्हणून राहत. या मोठ्या कुटुंबातील विविध कामांचा आणि जबाबदाऱ्यांचा बोजाही मोठ्या आनंदाने उचलत. ऋषितुल्य अशा गुरुच्या सहवासात राहिल्याने ज्ञानसंपादनाबरोबरच चारित्र्यसंवर्धन ही होत असे. ऑरोबिन्दो आश्रमाची उभारणी अशा प्रकारच्या विचारसरणीवरच झालेली आहे. मात्र तिथे जो संपूर्ण भर दिला जातो. तो व्यक्तिमात्राला जाणीवेच्या उच्च स्तरावर नेण्याचा, त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींमध्ये बदल घडवून आणण्याचा आणि उत्क्रांतीच्या पुढील पायरीवर जाण्यासाठी त्याची शारीरिक, मानसिक व आत्मिक तयारी करण्याचा.

श्री ऑरोबिन्दो आश्रमाची निर्मिती ही एखादा आश्रम स्थापन करायचा आहे, असे ठरवून झालेली नाही. १९१० साली श्री अरविंद पाँडिचेरीस आले तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांचे ४/५ सहकारी/साधक होते.



Auroville's Inauguration

१९१४ साली श्री अरविंदांनी 'आर्य' मासिक सुरू केले. या मासिकातून श्री अरविंदांच्या विचारांचा प्रसार होऊ लागला. आणि त्यामुळे अनेक जिज्ञासू साधक पाँडिचेरीस येऊ लागले. १९२० साली माताजीही कायम वास्तव्य करण्याच्या इरादाने पाँडिचेरीस आल्या आणि मग या सर्वांच्या राहण्याची, जेवणाची योग्य पद्धतीने व्यवस्था लावण्याची गरज भासू लागली. श्री अरविंदांनी ही सर्व जबाबदारी माताजींवर टाकली. पुढे १९२६ साली सिद्धी प्राप्त झाल्यावर आपली तपश्चर्या अधिक तीव्र करण्यासाठी श्री अरविंदांनी स्वतःला सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्त केलं. साधकांच्या दैनंदिन अडचणी निवारण करण्याची, त्यांना मार्गदर्शन करण्याची संपूर्ण जबाबदारी माताजींवर पडली आणि या सर्व कामांत सुसंगती आणण्याच्या प्रक्रियेतूनच श्री ऑरोबिन्दो आश्रमाची उभारणी सुरू झाली.

सर्वसंगपरित्याग करून, जीवनाकडे पाठ फिरवून, संन्यस्तवृत्तीनं एखाद्या अरण्यात अथवा हिमालयात जाऊन केवळ स्वतःला मुक्ती प्राप्त करून घेणं हा श्रीअरविंदाच्या योगाचा कधीही उद्देश नव्हता. श्री अरविंदांची विचारधारा असे सांगते की, सर्व श्रेष्ठ असा परमात्मा आहे. भौतिकतेमध्ये अडकलेली जाणिव उत्क्रांतीच्या मार्गाने त्या पूर्णत्वाकडे जाण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु त्यासाठी अतिमानस स्तरावरील जाणीवेचं बळ आणि कृपा आवश्यक आहे. अशा प्रकारच्या हेतूने प्रेरित झालेल्या आध्यात्मिक जीवनाचे केन्द्र जर निर्माण केले तर त्यायोगे या अतिमानसिक जाणिवेला पृथ्वीतलावर आणता येईल. आजचा मानव आणि त्याचे शरीर व मन अजून अपूर्णावस्थेत आहेत. त्यांना या पद्धतीत पूर्णावस्था लाभू शकेल आणि पृथ्वीतलावर दैवी जीवनाची सुरुवात होईल.

आज आश्रमात सुमारे २००० साधक आहेत. ज्याला परमेश्वराची हाक आली आहे आणि जो समर्पण भावनेने परमेश्वराच्यासाठी कोणतेही काम करण्यास सिद्ध आहे, अशा व्यक्तीलाच आश्रमात प्रवेश मिळतो; आणि इतर सर्व गोष्टी गौण मानल्या जातात. श्री अरविंद तर असं मानत की मानवतेची दैवी जीवनाकडे वाटचाल सुरू आहे. ही वाटचाल अधिक प्रकर्षाने व्हावी आणि त्यासाठी परमेश्वरी सहाय्य लाभावे, या हेतूने निर्माण झालेली ही एक प्रयोगशाळा आहे. यासाठी सर्व स्तरांतील स्त्रीपुरुषांना केवळ वरील निकषांच्या आधारे आश्रमात सामावून घेतलं गेलं. पंडित सातवळेकर शास्त्रींनी वयाच्या ९४ व्या वर्षी श्री ऑरोबिन्दो आश्रमास भेट दिली तेव्हा ते म्हणाले, "ज्या गोष्टीची मी गेली ५०/६० वर्षे प्रार्थना करत होतो, ती मला आज येथे पूर्ण रूपांत दिसत आहे. वैदिक काळानंतर असा प्रसंग पृथ्वीतलावर प्रथमच होत आहे."

प्रत्येक साधकाला त्याच्या योग्यतेनुसार काम दिलं जातं. मात्र कोणत्याही कामाला वरिष्ठ दर्जाचं अथवा कनिष्ठ दर्जाचं काम मानलं जात नाही. काम करण्याची क्षमता अथवा हुशारी यापेक्षाही काम किती कळकळीनं केलं जातं ते महत्त्वाचं ठरतं. काम करताना, हे परमेश्वरी कार्य आहे अशा भावनेत करणं. समर्पणाच्या भावनेत करणं याला महत्त्व दिलं जातं.

पूर्ण योगाच्या साधनेत शरीर आणि मन या दोन्ही साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. परमेश्वरानं मानवाला ही दोन साधनं दिली आहेत. पण या साधनांच्या योगे जर त्याला प्रगती साधावयाची असेल तर त्यासाठी प्रथम ही साधनं सक्षम बनवणं आवश्यक आहे. म्हणून शरीरसंपदेची हेळसांड करणं त्याकडे दुर्लक्ष करणं पूर्णयोगाला मंजूर नाही. आश्रमांत यासाठी प्रत्येक साधकाला नित्यनेमाने शारीरिक व्यायाम घ्यावा लागतो. सांघिक कवायतीही घेतल्या जातात. निरनिराळे खेळ खेळण्यास प्रोत्साहन दिलं जात.



नेमून दिलेलं काम प्रत्येक साधकाला जसं तन्मयतेने वेळच्या वेळी करावं लागतं. त्याचप्रमाणे शारीरिक व्यायामही रोज करावा लागतो. मात्र या दोन गोष्टी ठरावीक वेळी केल्यावर प्रत्येक साधकाला आपली साधना कधी करायची कशी करायची, किती वेळ करायची आणि कुठे करायची त्याचं पूर्ण स्वातंत्र्य असतं. कारण इथं आणखी एक गोष्ट ध्यानांत घ्यायला हवी. श्री अरविंदांच्या पूर्ण योगाच्या संकल्पनेत संपूर्ण जीवन म्हणजे एक योगच आहे. दिवसांतला एखादा तास मेडिटेशनला दिला अथवा काही कर्मकांड केलं म्हणजे साधना झाली असं नव्हे. जीवनाचा प्रत्येक क्षण म्हणजे साधना. आपण जे काम करत असू तो कर्मयोग व्हावा. मुळात आश्रमाचा प्रयोग हा एखाद्या व्यक्तीला जाणिवेच्या उच्च स्तरावर नेण्याचा आहेच. पण शिवाय सर्वांच्या सांघिक प्रयत्नांतून संपूर्ण मानवतेला, तिच्या इप्सित ध्येयाकडे नेण्याचाही आहे आणि यासाठी समाधीस्थानाजवळ आठवड्यातून चार दिवस सायंकाळी सामूहिक मेडिटेशन केलं जातं. या मेडिटेशनला कोणीही हजर राहू शकतो. मात्र दर गुरुवारी व रविवारी शाळेच्या क्रीडामैदानावर सायंकाळी होणाऱ्या मेडिटेशनला फक्त आश्रमवासी साधक आणि गेस्ट हाऊसमध्ये राहणारे साधक यानांच हजर राहता येते.

आश्रमाच्या सर्व व्यवहारांमध्ये पुरुष व स्त्रिया यांना समानतेनं वागवलं जातं. मात्र या समानतेचं बीज कशांत आहे तर, प्रत्येक व्यक्ती म्हणजे शरीर व मन यांच्या आवरणाखाली असणारा एक आत्मा आहे, या दृष्टिकोनांत आहे हे ध्यानात घ्यायला हवं.

पं. सातवळेकर शास्त्री यांना जेव्हा हा दृष्टिकोन समजला तेव्हा ते म्हणाले, ''माताजी तर येथे शुद्ध आध्यात्मिक समाजाची स्थापना करत आहेत. वेदांप्रमाणे आत्म्याच्या दृष्टीने स्त्री पुरुष असा भेद नाही. ज्या देशांत स्वयंशक्तीची स्त्री रुपात कल्पना केली गेली, त्याच देशात स्त्रीचा सतत अपमान केला गेला. तिला वेदपठणाचाही अधिकार ठेवला नाही. स्त्रीची खरी प्रगती येथे मला दिसली. वैदिक आदर्श येथे प्रत्यक्षात उतरलेले दिसतात''.

आश्रमातील सर्व साधकांना शुद्ध आणि पौष्टिक जेवण दिलं जातं. त्याप्रमाणे राहण्याच्या खोलीत टेबल खुर्ची, कपाट, वगैरे गोष्टीही दिल्या जातात. त्यांची सर्वतोपरी काळजी घेत असतानाच त्यांना लागणाऱ्या साबणा सारख्या किरकोळ वस्तूही दिल्या जातात. अशा प्रकारच्या वस्तू

ज्या खात्यातर्फे साधकांना पुरवल्या जातात त्या खात्याचं नाव माताजींनी समृद्धी (प्रॉस्पेरिटी) असं ठेवलं होतं. ते समजल्यावर पं. सातवळेकर शास्त्री म्हणाले, ''येथे खरी आध्यात्मिकता आहे. वेदांमध्ये संन्यासमार्गाचा कोठेही उपदेश केलेला नाही. पार्थिव जीवनावर, समृद्धीवर बहिष्कार किंवा जगाकडे पाठ फिरवून परलोकांचे चिंतन ही वैदिक शिकवण नाही. माताजी तुम्हाला समृद्धीचा उपदेश देत आहेत. रुक्ष जीवनाचा नाही. जिते जागते वैदिक युग हिथे जन्म घेत आहे.''

पं. सातवळेकर शास्त्रींनी ''समृद्धी'' या नावावरून जरी हे मत व्यक्त केलं असलं तरी, श्री अरविंद व माताजींचा याबाबतचा दृष्टिकोन जाणून घेणं आवश्यक आहे. आधुनिक काळाला अनुसरून अनेक सुविधांचा वापर अनिवार्य ठरतो. मात्र असा वापर करताना साधकाच मन त्यात गुंतून राहता नये. अशा सुविधांवर अवलंबून राहून साधकांनं त्यांचा गुलाम होऊ नये. या सुविधा जर काही कारणामुळे उपलब्ध नसतील तर त्यासाठी त्याचा जीव तुटू नये. जगापासून दूर कुठे तरी एकांतवासात स्वतःला बंदिस्त करून घेतल्या जाणाऱ्या बाह्य संन्यासापेक्षा अशा प्रकारची आंतरिक संन्यस्तवृत्ती निर्माण व्हायला हवी. त्यायोगे साधक खरी प्रगती साधून जाणिवेच्या उच्च स्तरावर जाऊ शकेल.



Rainwater harvesting at Quite

श्री आश्रमाला माताजींनी खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण बनवलं. आज जवळजवळ २००० आश्रमवासी साधक आणि तितकेच बाहेरून येणारे साधक आश्रमाच्या भोजनगृहात रोज सकाळी एकदा नाश्ता व दोन वेळा भोजन घेतात. सर्व जेवण शुद्ध शाकाहारी व पौष्टिक असतं. त्यांत दूध अथवा दही आणि केळं यांचाही समावेश असतो. अन्न शिजवण्याची प्रक्रिया अत्यंत आरोग्यपूर्ण अशी आहे. आश्रमाच्या अत्यंत आधुनिक अशा स्वयंपाकगृहात कुठेही हात न लावता वाफेवर ही प्रक्रिया केली जाते. जेवण वाढण्याचं आणि नंतर ताट, वाट्या, पेले निरनिराळ्या हौदात धुऊन, पुसून ठेवण्याचं अशी सर्व कामे साधक करतात. जेवण झाल्यावर तासाभराने आपण तिथे गेलो तर मागमूसही आढळणार नाही. एवढ्या लोकांच्या जेवणासाठी लागणारा तांदूळ, भाज्या, केळी आश्रमाच्या शेतावरून मिळतात. दूध व दह्याची गरज आश्रमाची डेअरी भागवते. आश्रमाच्या बेकरीत पाव बनतात. आश्रमाच्या मालकीची जवळजवळ २०० छोटी, मोठी घरे आहेत. त्यामध्ये साधक राहतात. एवढ्या मोठ्या कुटुंबाच्या निरनिराळ्या अडचणी निवारण करण्यासाठी अनेक छोटी मोठी खाती आहेत. लॉंड्री, इलेक्ट्रिकल सर्व्हिस, सुतार खाते, टेलरिंग सर्व्हिस इत्यादी.

याशिवाय आश्रमाच्या माध्यमातून कुटिरोद्योग चालवला जातो. उदबत्त्या, मेणबत्त्या, मोजे, बनियन, कापडाच्या निरनिराळ्या आकाराच्या पिशव्या, रबराच्या व चामड्याच्या चपला, बूट, पर्सेस, लाकडाच्या आणि धातूच्या कलाकुसरी केलेल्या वस्तू अशा असंख्य गोष्टी बनवल्या जातात. यांच्या विक्रीतूनही आश्रमाला काही पैसा मिळू शकतो.

आश्रमातील साधकांवर आणि इतरांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी दवाखाना व शुश्रुषागृह उभारण्यात आले आहे. परंतु आयुर्वेदिक व होमिओपाथिक

उपचाराचीही सोय करण्यात आली आहे. आश्रमातील नेत्र उपचार पद्धतीला मात्र सर्व दूर प्रसिद्धी मिळाली आहे. विशिष्ट प्रकारच्या व्यायाम पद्धतीचा अंतर्भाव करून डोळ्यावर नैसर्गिक उपचार केले जातात. या पद्धतीनं अनेकाची दृष्टी सुधारण्यास मदत झाली आहे.

आश्रमाचा स्वतःचा अत्यंत अद्ययावत असा छापखाना आहे. भारतातील जवळ जवळ सर्व भाषांत व काही परकीय भाषात पुस्तके छापण्यासाठी इथे सुविधा आहे. इंग्रजी व इतर भाषांतून काही मासिके व त्रैमासिक प्रस्तुत केली जातात. श्री अरविंदाच्या संपूर्ण लिखाणाचे जवळ जवळ ३० ग्रंथ, माताजींचे विचार आणि इतर साधकांनी लिहिलेले अनुभव आणि विचार अशी प्रचंड ग्रंथसंपदा निरनिराळ्या भाषांतून इथे छापली जाते व आश्रमाच्या वितरण व्यवस्थे मार्फत त्यांचे वितरण होते.

श्री ओरोबिन्दो इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशन या संस्थेला आश्रमांत एक अत्यंत अनन्यसाधारण असे महत्त्व दिलं जातं. भावी काळात पृथ्वीतलावर निर्माण होणाऱ्या दैवी जाणिवेचा आणि दैवी जीवनाचा स्वीकार करण्यासाठी भावी मानवतेला सर्वार्थानं सज्ज करणं हा श्री अरविंदाच्या योगसाधनेचा आणि आश्रमाच्या स्थापनेचा एक हेतू. या दृष्टिकोनातून एखादी शिक्षणसंस्था स्थापावी असा विचार श्री अरविंदाच्या मनात घोळत होता, आणि म्हणून त्या विचाराला मूर्त स्वरूप देण्यासाठी माताजींनी २ डिसेंबर १९४३ रोजी एका शाळेची स्थापना केली. त्यानंतर १९५१ साली पॉंडिचेरीत एक मोठे संमेलन भरवून त्यांनी श्री अरविंदाच्या स्मरणार्थ एक आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली व त्यानुसार ६ जानेवारी १९५२ रोजी श्री अरविंदो इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशन स्थापन झालं. या केंद्रामध्ये शिशुवर्गापासून उच्च वर्गापर्यंत शिक्षण दिलं जातं. अभ्यासक्रमामध्ये विविध भाषा, शास्त्र विषयाच्या विविध शाखा, तंत्रज्ञान, समाजशास्त्र यावरोबरच संगीत, नृत्य, नाट्य, चित्रकला आदी कलांचाही समावेश आहे. शिवाय शिक्षणाच्या या संपूर्ण कालावधीत शारीरिक शिक्षण, सांघिक खेळ आणि शर्यती यावरही विशेष भर दिला जातो.

श्री अरविंद व माताजी दोघांनाही संस्कृत भाषेच्या श्रेष्ठत्वाची आणि वैशिष्ट्याची पूर्ण जाणीव होती. संस्कृत भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळावा अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. याच दृष्टिकोनातून येथील बालवर्गातील मुलांना छोटी छोटी संस्कृत वाक्ये बोलण्याची सवय केली जाते. आधुनिक काळाला अनुसरून आता इथे संगणक शिक्षणाचीही सोय केली आहे. संस्थेचे ग्रंथालयही अतिशय सुंदर व भव्य आहे. अनेक भारतीय भाषांमधील व काही परकीय भाषांतील ग्रंथसंपदा इथे उपलब्ध आहे. श्री अरविंद म्हणतात, ''The new aim of education is to help the child to develop his intellectual asesthetic, emotioal, moral, spiritual being and his communal life and impulses out of his own temparament and being and to lead the child to discover for himself the aim of life in general, and the specific role that he himself has to play in life.'' अशा तऱ्हेच्या अत्यंत उदात्त आणि उच्च विचारांवर आधारलेल्या या शिक्षणसंस्थेचे कार्य गेली ५५ वर्षे चालू आहे.



Last School, Pondicherry



1872-1950

*Message on his Birthday*

*on*

*15th August 1947*

श्री ऑरोबिन्दो आश्रमाचं कार्य दिवसेंदिवस वाढू लागलं. त्याच्या विचारांचा प्रसार आणि प्रभाव देशात आणि परदेशातही होऊ लागला. आणि मग सर्वत्र पसरलेल्या या अनुयायांशी संपर्क ठेवण, त्यांना मार्गदर्शन करणं, श्री अरविंदांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवणं इत्यादी गोष्टींची गरज भासू लागली. अशा प्रकारच्या विविध कामांत सुसूत्रता आणण्यासाठी माताजींनी १९६० साली श्री अरविंद सोसायटी स्थापना केली. आज देशविदेशांत सोसायटीची जवळ जवळ ४०० केंद्रे आहेत. या केंद्रांतून श्री अरविंदांच्या विचारांचा प्रसार केला जातो. समाजापुढे असणाऱ्या विविध समस्यांवर चर्चासत्रे आयोजित करून श्री अरविंदांचा दृष्टिकोन मांडला जातो.

एखाद्या वटवृक्षाप्रमाणे आश्रमाच कार्य आणि त्याचा विस्तार सतत वाढत आहे. आश्रमाच्या वृद्धीबद्दल, कार्याबद्दल आणि भविष्याबद्दल माताजी म्हणतात-

"All has grwon up & developed like the growth of a forest. Each service was created not by any anti planning but by a living & dynamic need. The inspiration is from above, the guiding force is grown above & the creative power is also from above. The task is no doubt formidable one but we received the command to acomplish it and we are upon earth for that purpose alone"

असा हा पॉंडिचेरीचा श्री ऑरोबिन्दो आश्रम १९५० साली श्री अरविंदांनी आपल्या देहाचा त्याग केल्यानंतर जवळ जवळ २४ वर्षे सतत कार्यप्रवण राहून माताजींनी आश्रमाची सर्वांगीण प्रगती साधली. आता माताजीही नाहीत पण आश्रमात कार्य तेवढ्याच जोमानं चालू आहे. आश्रमाच्या परिसरात गेल्यावर एका अत्यंत नीरव शांततेची जाणीव तर होतेच पण शिवाय श्री अरविंद आणि श्री माताजी यांच्या प्रेरक शक्ती आजही तेथे सर्वांना मार्गदर्शन करत आहेत असे जाणवते.

**नरेंद्र नाडकर्णी**

सीडी- १०१, सी-१,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी क्र. : २५३३ ३१ ६०
E-mail : nd_nadkarni@yahoo.com

❑❑❑

# संदर्भ ग्रंथसूचीचे महत्त्व

*हा विषय ग्रंथपालन शास्त्राचा आहे. यात बरेच संशोधन झालेले आहे. तरीही श्री. आठल्ये हे नवीन ग्रंथपाल असल्याने त्यांच्या प्रयत्नपूर्वक लेखनास व्यासपीठ मिळावे, यासाठी हा लेख घेत आहोत - संपादक*

**प्रस्तावना:-**

कुठल्याही विषयाचा सर्वंकष अभ्यास करताना त्यातील प्रकाशित साहित्याची प्रथम समग्र माहिती गोळा करावी लागते. कोणतेही विचार मांडण्यापूर्वी किंवा पायाभूत बैठकीसाठी संबंधित साहित्याचा आधार अथवा उपलब्ध साहित्याची यादी हाताशी असावी लागते. सध्याच्या ज्ञानाच्या विस्फोटाच्या युगात अशी विस्कळितपणे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करण्याचे संदर्भ ग्रंथसूची हे उपयुक्त साधन आहे. विशेषतः विशिष्ट विषय नजरेसमोर ठेवून अभ्यास करणाऱ्याला तर त्याचे फारच महत्त्व असते.

**संदर्भ ग्रंथसूची म्हणजे काय?**

लेखकाने विशिष्ट विषय हाताळताना आधार म्हणून किंवा संदर्भ म्हणून उपयोगात आणलेल्या ग्रंथांची यादी, म्हणजे संदर्भ ग्रंथसूची असे म्हणता येईल.

लेखक विशिष्ट साहित्यकृती निर्माण करण्यापूर्वी उपयुक्त अशी माहिती गोळा करीत असतो. ही माहिती तो प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, सांख्यिकीय नोंदी तसेच ग्रंथ, नियतकालिकातील लेख, संदर्भ साधने याद्वारेही प्राप्त करीत असतो. कोणते ग्रंथ, लेख, संदर्भ साधने त्याला उपयुक्त ठरले, याची यादी तो देत असतो. या यादीतील साहित्याचा त्याला आपले मत बनवण्यासाठी उपयोग झालेला असतो. या यादीलाच संदर्भ ग्रंथसूची असे म्हणतात.

ही यादी ग्रंथाच्या किंवा लेखाच्या शेवटी देण्यात येते. ही बहुधा अनुवर्णानुसार असते. तसेच संदर्भसाहित्य बहुभाषेतील असले तर भाषेनुसार यादी देण्यात येऊन मातृभाषेतील संदर्भ आधी देण्याचा प्रघात आहे.

**उपयोग:-**

संदर्भ ग्रंथसूचीचा उपयोग अनेक प्रकारे होत असतो. लेख आणि संदर्भ ग्रंथसूची यांचे एका अर्थी ग्रंथाशयी नाते (Bibliographic Coupling) असते. हे एकाच विषयाशी संबंधित असतात. म्हणजेच कोणता तरी एक धागा यांच्यात समान असतो. तसेच लेखकाने किती सखोल अभ्यास केला आहे हे समजून येते. कोणत्या माहितीचा कसा अर्थ लावला आहे, तो कसा लावायला हवा, याचाही अंदाज पुढील अभ्यासकांना येऊ शकतो. नवीन संशोधनासाठी दिशा मिळते. विशिष्ट विषय किंवा लेख समजून घेताना आणखीन कोणते साहित्य नजरेखालून घालायला हवे, हे समजते. अशा प्रकारे वाचनाचा व्यासंग वाढवता येऊ शकतो.

**संदर्भ ग्रंथसूचीचे महत्त्व**

संदर्भ ग्रंथसूची हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. पुढील कारणांसाठी त्याचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे.

१) याद्वारे किती संख्येने लेखकाने विषयाचा धांडोळा घेतला आहे, हे समजते.

२) विशिष्ट लेखाचा तपशीलात जाऊन अभ्यास करायचा झाल्यास आणखीन कोणती माहिती पाहावी

लागेल हे यावरून कळते.

३)कोणत्या विशिष्ट माहितीच्या आधारे लेखकाने आपले मत बनवले आहे, हे लक्षात येते. तसेच त्याला दुसराही पर्याय आहे का, हे पडताळून पाहता येते.

४) एखादा विशिष्ट विषय किती व्यापक आहे, याची जाणीव होते.

५) काही अन्य पैलू दुर्लक्षित झाले असल्यास ते लक्षात येतात व त्यावरून पुढील संशोधनास चालना मिळते.

## सूची देण्याच्या पद्धती

मात्र असे असूनही या प्रकाराकडे म्हणावे तसे गांभीर्याने पाहिले जात नाही. बऱ्याचदा अशी सूचीच दिलेली नसते. दिल्यास त्रोटक किंवा अपूर्ण दिली जाते. नोंदी व्यवस्थित नसतात. पद्धती वेगवेगळ्या असतात. एकंदर माहितीत अपुरेपणा आढळतो व विश्वसनीयता घसरते.

या संदर्भात नमुन्यादाखल काही नोंदी प्रत्यक्षच अभ्यासल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

उदा. १:- संत, दु.का (१९८९) : मनुष्याची ज्ञानसाधना, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

उदा. २:-John Gassner, Master of the Drama, New York : Dover Publications, Inc 1954, p.315

उदा. ३:- बा. गं. टिळक, श्रीमद्‌भगवद्‌गीता रहस्य अथवा कर्मयोगशास्त्र, ६ वी आ. पुणे, १९५०, पृ...

उदा. ४ :- Alagh, Y.K. (1995), "Globalization and Agricultural crisis in India" Deep and Deep Publications, New Delhi.

उदा. ५ :- Ambedkar, B. R. Who were the Shudras? (Available in Podar College of Commerce Library, Mumbai 119)

उदा. ६:- आर्य वीरांगना - के. ब. डोंगरे

उदा. ७:- कुलकर्णी, भीमराव, 'ऐतिहासिक मराठी नाटके,' प्र. आ., जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे - १९७१

उदा. ८:- अ. का. प्रियोळकर, "गोविंद नारायण माडगांवकर," मराठी संशोधन पत्रिका, व.१२, अं. ३ (एप्रिल, १९६५), पृ. १-२४

उदा. ९:- Saila Karla and Karam Singh (2000), "Economic Viability and Equity Issues in Financial Institutional Reforms ! A study of Regional Rural Banks in Punjab," Indian Journal of Agricultural Economics, Vol.55, No.4, pp627-643

वरील उदाहरणांपैकी १ ते ७ क्रमांकाच्या नोंदी या ग्रंथांच्या असून ८ व ९ क्रमांकाच्या नोंदी या लेखांच्या आहेत.

या नोंदीकडे लक्षपूर्वक पाहिल्यास असे जाणवते की सर्व नोंदींमध्ये विविधता आहे. प्रत्येक नोंदीत वेगळेपणा आहे. पण, प्रत्येक नोंद परिपूर्ण आहेच असे नाही.

आता इथे परिपूर्ण नोंद म्हणजे काय, ते समजून घेणे इष्ट ठरेल. आपण परिपूर्ण नोंद त्याला म्हणू शकू ज्यात खालील गुणधर्म आढळतात.

अ) तिच्यातील माहिती ही सविस्तर असावी.

आ) त्यात अनावश्यक व अधिक प्रमाणात शब्द व विरामचिन्हांचा वापर केलेला नसावा.

इ) नोंद अलिप्त व सर्वव्यापी असावी.

ई) नोंद अर्थपूर्ण असावी.

या गुणधर्मांच्या आधारे आपण वरील उदाहरणांतील नोंदी पाहू लागल्यास काही त्रुटी आपल्या लक्षात येतात. उदाहरणार्थ -

१) काही नोंदी फारच संक्षिप्त आहेत. (उदा.६) यावरून फारसा काही बोध होत नाही.

२) अनावश्यक शब्दांचा वापर आढळतो. (उदा.७) यात प्रथम आवृत्ती हा उल्लेख करण्याचे, तसेच प्रकाशन हा शब्द लिहिण्याचे कारण नाही.

३) वैयक्तिक अनुभवाचा प्रभाव आढळतो. (उदा.५) यात पोदार ग्रंथालयात हे पुस्तक आढळल्याचा उल्लेख आहे. हे ग्रंथालय मुंबईत राहणाऱ्यास कदाचित ठाऊकही असेल, पण अंबड या सारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या अभ्यासकाला याचा काय उपयोग?

४) अनेक विरामचिन्हे जवळ येतात. (उदा.४) यात स्वल्पविराम, कंस, अवतरण इ. चिन्हे जवळजवळ येऊन दाटी करतात.

## मार्गदर्शक तत्त्वे

वर उल्लेखलेल्या त्रुटी टाळण्याकरिता विशिष्ट नियमांनुसार अशा नोंदी करणे गरजेचे असते. त्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे खाली दिली आहेत.

१) संदर्भ साहित्य अनेक भाषांतून दिलेले असल्यास विषयानुसार सूची द्यावी. त्यातही मातृभाषेला किंवा लेख ज्या भाषेत आहे त्या भाषेला अग्रक्रम द्यावा.

२) बऱ्याचदा संदर्भ साहित्य विविध प्रकारांतील असते. अशा वेळेस ग्रंथ, नियतकालिकांतील लेख, अप्रकाशित प्रबंध, संदर्भ साधने व संदर्भ नोंदी असा क्रम असावा.

३) संदर्भ हे विविध माध्यमांतील असल्यास आधी ग्रंथ व तत्सम माध्यमांतील संदर्भांची नोंद करावी व नंतर ग्रंथेतर मुद्रित व अमुद्रित साधनांचा क्रम लावावा.

४) ग्रंथांच्या बाबतीत नोंद करताना ती ग्रंथकाराच्या नावाने करावी; व नंतर ग्रंथनाम, आवृत्ती, प्रकाशन स्थळ, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व एकूण पृष्ठे असा उल्लेख असावा.

उदाहरणार्थ, एखाद्या संदर्भ ग्रंथसूचीत नारायण हरी पालकर यांनी लिहिलेल्या इस्राएल : छळातून बळाकडे या अपर्णा प्रकाशन, मुंबई यांच्या प्रकाशनाचा समावेश आहे. याचे प्रकाशन वर्ष २००२ असून आवृत्ती चौथी आहे. एकूण पृष्ठे पंचवीस, २३८ आहेत. तर त्याची नोंद खालीलप्रमाणे करावी :-

पालकर, नारायण हरी

इस्राएल : छळाकडून बळाकडे, ४थी आ., मुंबई : अपर्णा, २००२, पृ. पंचवीस, २३८.

५) लेखाच्या बाबतीत नोंद करताना ती लेखकाच्या नावाने करून लेखाचे शीर्षक, समाविष्ट हा शब्द (अधोरेखित करून), नियतकालिकाचे नाव, संपादक, खंड क्रमांक, अंक क्रमांक, प्रकाशन स्थळ, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व पृष्ठ क्रमांक देण्यात यावा. अनेक पृष्ठे असतील तर पाहिला व शेवटचा पृष्ठ क्रमांक देऊन मधल्या पृष्ठांसाठी आडवी रेघ (Hyphen) देण्यात यावी.

उदाहरणार्थ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे प्रकाशित होणाऱ्या रमेश वरखडे संपादित ज्ञानगंगोत्री या त्रैमासिकाच्या सप्टें-नोव्हें. २००४ च्या खंड ५, अंक२ मध्ये डॉ. प्रदीप कर्णिक यांचा '१८६७ चा ग्रंथसंरक्षण कायदा आणि प्रा. अ. का. प्रियोळकर यांचे संशोधन' हा पृष्ठ क्रमांक ६-१५ वर लेख दिलेला आहे. त्याची नोंद खालीलप्रमाणे केली जाईल.

कर्णिक, प्रदीप

१८६७ चा ग्रंथसंरक्षण कायदा आणि प्रा. अ.का. प्रियोळ्कर यांचे संशोधन

<u>समाविष्ट</u> : ज्ञानगंगोत्री

संपा.: रमेश वरखेडे

खंड ५, अंक २

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सप्टें-नोव्हें. -२००४

पृ. ६-१५

६) इंटरनेटवरील उल्लेख करताना वेबसाईट देऊन दिनांक व वार द्यावेत.

७) सी. डी. / ध्वनिफीत यासारख्या साधनांचा उल्लेख करताना शीर्षक, लेखक, प्रकाशक व प्रकाशन वर्ष असा क्रम असावा.

८) सूची देताना कुठलेही चिन्ह काळजीपूर्वक वापरावे. विरामचिन्हांचा क्रम व जागा निश्चित असावी. उदाहरणार्थ, प्रकाशन स्थळाचा उल्लेख केल्यावर विसर्ग (:) या चिन्हाचा वापर करावा.

९) संदर्भ ग्रंथसूची देताना अनुक्रमांक हे शेवटपर्यंत सलग दिले जातात. काही वेळा माध्यमानुसार, भाषानुसार वेगवेगळेही दिले जातात. यापैकी कोणतीही एक पद्धती वापरली तरी चालते.

१०) ही सूची अनुवर्णाप्रमाणे असावी. भाषा बदलल्यास त्या बदललेल्या भाषेतील अनुवर्णानुसार सूची बनवावी.

११) नोंद करताना दुसरी ओळ ही पहिल्या ओळींतील दोन अक्षरांइतके अंतर सोडून लिहावी. तिसऱ्या ओळीपासूनच्या पुढच्या ओळी या दुसऱ्या ओळीप्रमाणे लिहाव्यात. जेव्हा अनेक नोंदी असतात तेव्हा नवी नोंद कुठे सुरू होते, हे यावरून चटकन समजते.

**सारांश:**

एम.लिब., एम. फिल. किंवा पी. एच.डी. यासारख्या अभ्यासक्रमात प्रबंध लेखनाचा भाग असतो. त्यातील अत्यंत महत्वाचा पण विद्यार्थ्यांकडून हमखास दुर्लक्षिला जाणारा असा हा संदर्भ ग्रंथसूचीचा भाग आहे. याचे महत्त्व नीट जाणून घेतल्यास प्रथमपासूनच योग्य ती काळजी घेता येईल. बऱ्याचदा या नोंदी कशा ठेवायच्या, यांचा उपयोग कसा करायचा, हे नीट न कळल्याने त्याच परिणाम प्रबंधाचा दर्जा खालावण्यात होतो. हे टाळण्यासाठी संदर्भ ग्रंथसूचीचे महत्त्व लक्षात घेणे, अतिशय गरजेचे आहे.

**श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये**

ग्रंथपाल

स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,

डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

**दिशा**

**वर्गणीसाठी संपर्क:**

**विद्या प्रसारक मंडळ**

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर,**

**नौपाडा, ठाणे.**

**दूरध्वनी २५४२६२७०**

पुस्तक परिचय

गीताविश्व

# गीता जीवन साधना

*गीतेवरील 'गीता जीवन साधना' या पुस्तकाचा परिचय - संपादक*

या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ॐ तत् सत् असे तीन गोलार्ध काढले आहे. पहिल्या गोलार्धात ओंकार साधना करतानाचे चित्र (ज्ञान) आहे. दुसऱ्यात कर्म (त्) तिसऱ्यात भक्ती म्हणजे ध्यान (सत्) दाखवली आहे. मलपृष्ठावर लेखकाचा परिचय आहे. लेखक सिव्हिल इंजिनिअर आहेत. जयपूर कन्स्ट्रक्शन कंपनीत नोकरी चालू असतानाच विवेकानंदाच्या वाङ्मयाचे वाचन केले व गीता वाचनाची ओढ निर्माण झाली व हळूहळू अभ्यास चालू असताना पुणे येथे स्वतःचा व्यवसाय चालू केला. लहानपणापासून धार्मिक वातावरणात वाढल्यामुळे गरजेपुरताच पैसा मिळवायचा, एवढाच उद्देश ठेऊन व्यवसाय केला. निसर्ग, शेती व आयुर्वेदाचाही थोडाफार अभ्यास, 'मंगलारोग्य' व 'निसर्ग शेतीचे ज्ञान विज्ञान'ही पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत.

गीतेतील योग जीवनपद्धती ही स्वयंसिद्ध आहे. आजच्या युगात गीतेच्या आधारे ती कशी सिद्ध होते हे सांगण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात लेखकाने केला आहे. अनुक्रमणिकेत 'भाग पहिला ॐ तत्सत-ही माझी भूमिका' हे पहिले प्रकरण आहे. ग्रंथातला प्रत्येक विचार हे 'माझं चिंतन' आहे. "संस्कृतचा माझा अभ्यास नाही तरी गीतेवर नितान्त श्रद्धा व ओढ यातून गीतेचा अभ्यास केला. मी गीतेवर आजवर लिहिले गेलेले कुठलेही साहित्य वाचलेले नाही. फक्त गीता ग्रंथाचा अभ्यास व पारायणे यातून 'गीता जीवनसाधना' हे मला प्राप्त झालेले विचारधन होय. यातून माझा स्वभाव गीता, माझी श्रद्धाही गीताच!"

गीतेच्या समारोपात भगवंताने म्हटले आहे की ज्याला ज्ञानग्रहणाची इच्छा नाही, जो माझी निंदा करतो त्याला ही राजविद्या देऊ नये. लेखक म्हणतो, मात्र मला प्रामाणिकपणे वाटते की सारे दुर्गुण ज्याच्याकडे आहेत त्यालाच वास्तविक गीता ज्ञानाची गरज आहे.

एक गोष्ट इथे स्पष्ट करते, ती ही की, अनुक्रमणिकेत भाग पहिला यात जे क्रमांक दिले आहेत व प्रकरणांना नावे दिली आहेत ती गीतेच्या अध्यायांचीच नावे नाहीत. म्हणजे अध्यायाप्रमाणे ओळीने ही प्रकरणे नाहीत. लेखकाने गीतेचे तत्त्वज्ञान भाग पहिला यात दहा प्रकरणे व भाग दुसरा यात १७ प्रकरणे व १८,१९,२०,२१ अशी चार परिशिष्टे जोडली आहेत.

मी हा जो कोणी आहे तो ह्या 'देहातून' वेगळा अज,अव्यय नित्य आहे. देह मात्र अनित्य. काही अज्ञात कारणांनी तो ह्या देहात स्थित आहे. तमोगुणांकडून सत्त्वगुणाकडे झालेली मनुष्य जीवनाची वाटचाल म्हणजे अज्ञानाकडून विज्ञानमार्गाने ज्ञानमार्गी केलेली आगेकूच. तरीही सारे गुण शेवटी बंधन करतात. अज्ञानच बंधन करते असे नव्हे तर ज्ञान प्राप्तीचा शिष्टपणाही आपण व्यवहारात अनुभवतोच. जसे बेडी, मग ती सोन्याची असली तरी बेडीच, त्याप्रमाणे अहंकाराने भारलेला ज्ञानी देखील बंधनमुक्त नव्हेच.

तेव्हा गीता जीवन साधना हीच की, वर्णप्राप्त कर्मांचे आचरण करीत असता उत्तरोत्तर उच्चगुण मंडित जीवन व्यवस्थापन करणे. अखेरीस हे कर्तव्य कर्माचरण ज्ञान, गुण, सारेच मागे सोडणे, केवळ अनन्य श्रद्धा भक्तीने परिपूर्ण होत्साते अद्वैतात विरून जाणे.

याजन्मी प्राप्त गुणकर्म हे पूर्वजन्मीचे संचित पण त्या संचिताच्या स्वरूपावर गीता जीवन साधना अवलंबून नसते. वर्णप्राप्त कर्तव्यकर्म करावे आणि गुणातीत व्हावे. जेणेकरून गुण-कर्म-गुण ही साखळी भंग पावेल, आणि पुढल्या जन्माचे संचित रोडावेल!

गीता सांगते, इंद्रियाचे दमन करू नका. इंद्रियांना आवरा. त्यांना समजवा, इंद्रियांना त्यांच्या विषयाशी सम्यकपणे संलग्न होऊ द्या, मात्र मनासाठी तो चिंतन विषय होऊ देऊ नका. चिंतन विषय एकच, तो म्हणजे परमात्मा. शरणागती त्याच्या पायांशी. सामान्य मनुष्य मात्र रजोगुणोद्भव कामाला आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या लोभ व क्रोधाला शरण जातो.

बुद्धीला कितीही शिणवले तरी अनंताची संकल्पना ती साकारू शकणार नाही. मला उपलब्ध असलेली ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मनाची कल्पकता, बुद्धीची स्मरणक्षमता या साऱ्या गोष्टी सांताच्या परिघात उपलब्ध होतात. अनंताचा वेध त्यांना घेता येणार नाही.

'गीता जीवन साधना' या पुस्तकातील काही भाग मी वर उद्धृत केला आहे. त्यावरून आपल्याला लेखकाच्या ओघवत्या शैलीची गीतेवरील भाष्याची कल्पना येईल. व पुस्तक वाचावे असे वाटेल.

लेखक म्हणतो, या ग्रंथातला प्रत्येक विचार, हर एक चिंतन माझं आहे. आजच्या समाज व्यवस्थेचे गीता विचाराधारे मी ते केलेले आहे. 'गीता जीवन साधना' ही प्रामुख्याने तत्त्वज्ञानाच्या अंगाने विकसित होत जाते. गीतेतील योग जीवनपद्धती ही स्वयंसिद्ध आहे. आजच्या युगात ती गीताधारे कशी सिद्ध होते हे सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे.

महाभारत काळी कदाचित ब्रह्मास्त्राचा वापर अपरिपक्व बुद्धीने झाल्याने, स्थिती बरी होती म्हणायची वेळ यावयाची. त्यावेळी भगवंतांनी अवतार घेतलेला होता. आज मात्र आपल्याला या दुर्धर परिस्थितीतून मार्ग काढावयाचा आहे. त्यासाठी ही गीता जीवनसाधना गीताधर्म हा असा अक्षुण्ण आहे.

'गीता जीवनदर्शन- भारत वर्षाचे: काल-आज-उद्या' ह्या प्रकरणात आज भारतीय जीवनपद्धतीला कुठूनही कसेही ओरबाडणारे, बटबटीत, चंगळवादाचे स्वरूप आले आहे. ह्या भूमीमध्ये त्यागाची पूजा झाली, भोगाची नाही. आज भोगाच्या पलीकडे आम्हांला काहीही दिसनासेच झाले आहे. सग्यासोयऱ्यांचा मृत्यू त्याला आजही दुःखी करतो, क्षणभर अंतर्मुखही! पण तेवढेच. पुन्हा ते चंगळवादाचे पैशासाठी धावण्याचे. रमणे सुरू! ही क्षणभराची अंतर्मुखता त्याला मग देवाच्या भक्तीची प्रेरणा देते. पण पैसा, पैसा आणि पैसा या जीवन पद्धतीचा अंगीकार केलेला हा भारतीय, देवाची पूजा सुद्धा पैशानेच बांधतो.

धर्म हा भारतीयांचा आत्मा होय. नजिकच्या भविष्य काळात ह्या भूमीला जर पुन्हा तीच स्वर्गाहून श्रेष्ठ ही बिरुदावली मिळवून द्यायची असेल तर निधर्मतेचे खूळ प्रथम नष्ट करावे लागेल. निधर्मतेची संकल्पना वास्तवात लबाड लोक आपल्या अनैतिकतेला सुरक्षित करण्याच्या हेतूने वापरतात. शत्रूला गीता स्वच्छ शब्दांत वध- योग्य मानते. पितामह व गुरूला देखील हा नियम लागू होतो. तर, आपल्या भूप्रदेशाकडे वाकडा डोळा करून पाहाणाऱ्यांशी वाटाघाटी कसल्या? प्रथम त्याला पराभूत करा आणि नंतर मैत्रीचा हात पुढे करा.

विज्ञान निष्ठतेच्या ढोंगापायी आणि पैशाच्या लालसेने आज निसर्ग छिन्नभिन्न होत आहे. नैतिकतेच्या अध:पतनाने तळ गाठला आहे. या भ्रष्टाचाराने देवळातील देवाला सुद्धा भ्रष्ट केले आहे. धर्म, ज्ञान, भक्ती, कर्म सारे काही आज कलंकित झाले आहे!

आमच्या पुरुषार्थाने पुन्हा एकदा ह्या जगाचे डोळे दिपवून टाकायचे आहेत. प्रगत देशांची होऊ घातलेली अधोगती थोपवायची आहे. म्हणून योगी हो भारता, योगी हो! असे परखड विचार ह्यात लेखकाने मांडले आहेत.

'गीतोपदेशी जीवनसाधना' ह्या प्रकरणात लेखक म्हणतो 'योगी स्वर्गप्राप्तीने संतुष्ट नसतो. त्याला आस असते ती स्वर्गासह ह्या चराचर निर्मात्याची. तो म्हणेल पुरुषोत्तम प्राप्तीचा मार्ग माहीत असेल तर सांग; नाहीपेक्षा मला पुन्हा धरतीवर पाठव. मी इथून पुढे वासुदेवाचा शोध सुरू ठेवेन मला स्वर्गाची अजिबात लालसा नाही. मी मिठाई नव्हे, मिठाईवाला शोधतोय. कारण मिठाई खाऊन संपेल, मिठाईवालाच प्राप्त झाला की मिठाईच्या उपलब्धतेला कोणती मर्यादा?

ज्यापासून सर्वभूतांची उत्पत्ती, ज्याने हे सर्व जगत् आदि, स्थिती अंती व्यापले आहे, त्याचे आपल्या स्वाभाविक कर्माद्वारे पूजन हीच जीवनसाधना होय.

ह्या सोळाव्या प्रकरणानंतर परिशिष्ट १ - स्थितप्रज्ञाची लक्षणे, परिशिष्ट २ त्रयोगुण (तक्त्यासह) परिशिष्ट ३ भगवंत विभूती, परिशिष्ट ४ वेदांनी उपदेशिलेले यज्ञ.

असे हे 'गीता जीवन साधना' पुस्तक, गीतेच्या वाचन, मनन, चिंतनाच्या लेखकावर पडलेल्या प्रभावातून व्यक्त झालेले आहे. त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

**आशा भिडे**

बी/९ विजय अपार्टमेंट आराधना टॉकीजवळ
ठाणे (प.) ४०० ६०२ दूरध्वनी - २५४१००१४०

प्रकाशक : गीता धर्म पुणे-३०, पृष्ठे १५७
मूल्य ७० रुपये. प्रथमावृत्ती १९९७

## पं महादेवशास्त्री जोशी यांच्या कथांतून निघालेले चित्रपट

| | चित्रपटाचे नाव | लघुकथा | / वर्ष |
|---|---|---|---|
| १) | कन्यादान (मराठी) | जगावेगळे सासर | १९६० |
| | बहुबेटी (हिंदी) | जगावेगळे सासर | १९६५ |
| २) | मानिनी (मराठी) | मानिनी | १९६१ |
| ३) | गरिबाघरची लेक(मराठी) | पुरंदरची शिकार | १९६३ |
| ४) | वैशाख वणवा (मराठी) | वैशाख वणवा | १९६४ |
| ५) | थांब लक्ष्मी कुंकू लावते (मराठी) | गृहलक्ष्मी | १९६८ |
| | गृहलक्ष्मी (तमीळ, तेलगू, गुजराती, कन्नड) | | |
| ६) | धर्मकन्या (मराठी) | वरीयी+अन्न ना पात्र | १९७० |
| ७) | जिव्हाळा (मराठी) | जिव्हाळा | १९६९ |
| ८) | अरे संसार! संसार !! (मराठी) | तीन मुलांची आई | |
| ९) | जावई माझा भला (मराठी) | बहिष्कार, + चोर आहेत दोघे | |

### *तीर्थरुप महाराष्ट्र डॉक्युमेंट्रीज :*

१) आळंदी
२) सज्जनगड

# माणूस : काही क्षण विचारांचे

*माणसांची निरीक्षणं करताना, माणूस शोधण्याचे हे क्षण ! - संपादक*

### अरे, माणसा माणसा..........'

सद्गुरु वामनराव पै यांचे आवडते वाक्य म्हणजे 'माणसे माणसांशी माणसांसारखी वागत नाहीत हेच सर्व समस्यांचे मूळ आहे!'

माणसांनी माणसांशी माणसांसारखे वागावे म्हणजे काय? जीवन व्यवहारात भेटतात ती सर्वच माणसे असतात का? चांगले व वाईट वागण्याचे निकष ठरवायचे कोणी आणि कसे? समर्थ रामदास स्वामींनी सोप्या शब्दांत 'जगी वंद्य ते सर्व भावे करावे' असे चांगले वागण्याच्या संदर्भात केलेले वर्णन आज लागू आहे काय? आज जगात वंद्य असणारी बाब म्हणजे पैसा आणि सत्ता! जे निंद्य होते ते वंद्य झाले, जी माणसे होती ती माणसे राहिली नाहीत, मग माणसांशी कसे वागायचे? मुळात माणसांचा या जगातील व्यवहार हाच घृणास्पद ठरत चालला आहे!

कै. व.पु. काळे यांनी 'आपण सारे अर्जुन' असे या अवस्थेचे केलेले अचूक वर्णन पदोपदी अनुभवास येते, महाभारतात कुरुक्षेत्रावर अर्जुनाचे काय झाले असेल, तो अनुभव पदोपदी येतोय! फरक एवढाच की त्याला साक्षात भगवंताचे मार्गदर्शन लाभले ! आजच्या माणसाला भगवंत भेटणार कुठे?

खोलवर जाऊन माणसांचा, माणसांच्या स्वभावांचा आणि वागण्याचा विचार करा. माणसाची कोणतीही कृती भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरत आहे. चांगले वागणे, वाईट वागणे यांचे संदर्भ शंकास्पद ठरत चालले आहेत. "पशुतुल्य" माणूस असे म्हणताच येत नाही, कारण पशू माणसांपेक्षा खूपच चांगले असतात. अशी तुलना केली तर ती चूकच ठरेल!

### <u>माणसाच्या छटा २</u>

'देवमाणूस' हा शब्द फार गमतीशीर आहे. देव या संकल्पनेतील मांगल्य, कल्याणप्रद भाव या विशेषणात आहे. शि.म. परांजपे यांचा 'जसे लोक तसे त्यांचे देव' या नावाचा विचारगर्भ लेख आहे. देव ही संकल्पना माणसाने निर्माण केली. त्यामुळे स्वत:तील गुणदोषांसह असणाऱ्या मनुष्याचे आरोपण देवावर केले. निर्गुण, निराकार व अनंत अशा, संपूर्ण जीवनावर नियंत्रण असणाऱ्या त्या शक्तीला कल्पनाबद्ध करणारा देव हा शब्द.

मुळात माणसाचे सर्वच व्यवहार स्वार्थप्रेरित असतात. स्वार्थ नसेल, स्वार्थाची प्रेरणाच नसेल तर माणसे अस्तित्वातच येणार नाहीत. प्रश्न फक्त स्वार्थ किती असावा, कसा असावा याबाबत आहे. निरपेक्ष अशी मुमुक्षुची अवस्था ही संकल्पना आहे. त्यामुळे 'देवमाणूस' हा शब्द मला फसवा, गमतीचा वाटतो.

माणसाचा दुसऱ्या माणसाला असणारा परिचय हा तरी कुठे समग्र असतो? जे. कृष्णमूर्तींच्या शिक्षणासंदर्भातील एका प्रवचनात यासंदर्भात फार मौलिक विवेचन आहे. पलीकडचा माणूस पूर्ण समजणे अवघड, अशा स्थितीत एकाने त्याला देवमाणूस म्हणायचे, तर दुसरा दानवाबरोबर त्याची तुलना करणार. हे विचित्रच आहे. मी कोण, माझे प्रयोजन काय हे पूर्ण न कळताच, वीतभर उंचीच्या उड्या मारत अहंभावात माणसे जगतात, संपून जातात. रामकृष्ण परमहंसांच्या मतांचा संदर्भ येथे आठवतो. अशा प्रकाराने कोणताही माणूस देवस्वरूप वा दानवस्वरूप ठरवणे किती हास्यास्पद आहे. पलीकडचा माणूस किती वाईट हे ठरवण्याची अहमहमिका करणारी माणसे, त्यांचे स्वार्थी हेतू, जगाचा त्यांना दिसणारा त्यांच्या

डोक्या एवढाच अर्थ हे सर्व विचित्र आहे. त्यामुळे चांगला व वाईट या विशेषणांच्या सापेक्ष छटा तपासून पहायला हव्यात.

## हवा डोक्यात गेलेली माणसे ३

कितीही पैसा आणि यश मिळालं तरी माणसाचे पाय जमिनीवर असायला हवेत, म्हणजेच इतरांशी त्याचं वागणं माणसासारखंच असावं असं म्हणतात. माणसाच्या जीवन पद्धतीची रचना आणि मनोव्यापारांचे स्वरूप पाहिले तर हे फार अवघड असते. या पैशाची आणि यशाची परिमाणे व्यक्तिसापेक्ष असतात.

पैशांची धुंदी, पैशांचा माज, यश डोक्यात जाणे असे शब्द आपण केवळ वापरत नाही, तर अशी माणसं पदोपदी भेटतात. कोणाचं ध्येय काय व का असावं हे पुन्हा सापेक्ष असतं. पण ते एकदा साध्य झालं की वागणं बदलावं का? माणसांचे नमुने इतके अगणित आहेत की कोणाबद्दल काय आडाखे बांधावेत हे ठरवणंही अशक्य आहे. मुळात माणसांनी माणसांकडून अपेक्षा करावी का, आणि का करावी हा ही प्रश्नच आहे. फळाची अपेक्षा न ठेवता काम करायला सांगणाऱ्या गीतेचे तत्त्वज्ञान एकीकडे आणि अपेक्षा न ठेवता जगताच येणार नाही असे जीवनाचे वास्तव स्वरूप दुसरीकडे. त्यामुळे माणसाशी सामान्यपणे (माणसासारखे म्हणण्याचे मी टाळतो) माणसांनी वागावं इतपत अपेक्षा वाजवी ठरेल.

पण पैसा आणि यश यामुळे माणसं हवेत तरंगतात, तेव्हा त्यांच्या अस्तित्त्वाचंच कोडं होतं! निदान इतरांना तुच्छ लेखू नये, पण ही माणसं पदोपदी दुसऱ्याचे अपमान करतात. त्यांच्या आत्मभिमानाचा भंग करतात. अशी माणसं नसलेली एखादी पृथ्वी हे कवीच्या स्वप्नातलं सत्य होईल. किशोरकुमारने "आ चल के तुझे मैं लेके चलूं ........" म्हणत केलेला सुखी जगाचा उल्लेख मनात रेंगाळत रहातो. ' मी मी ' करणारी अल्पबुद्धी माणसं, निदान त्या जगात नसतील. पण ते जग आहे कुठे?

## वास्तवात नसणारी माणस ४

काही माणसे वर्तमानात रुतून बसणारी, काही भूतकाळात रमणारी; तर काही भविष्याच्या चिंताग्रस्त जगात आयुष्याचे क्षण मोजणारी असतात. माणसाचा स्वभावच निसर्गतः यापैकी एका काळात रमणारा असावा ही एक मजेशीर बाब आहे.

अशी एकाच काळात हरवणारी माणसे इतर दोन काळातील माणसांच्या सहवासात आली की विचारांचे दृष्टिकोनांचे सूर बिघडतात व मतभेदांना सुरुवात होते. 'आमच्या वेळी' असं नव्हतं असं म्हणत भूतकाळात रमणारी माणसं वेगाने म्हातारी होतात. खरे तर, काळ हेच एक त्रिकालबाधित सत्य असल्याने, 'तो काळच वेगळा होता,' या म्हणण्याचा संदर्भ व्यक्तीच्या अटळ वृद्ध होण्याच्या क्रियेशी लागतो.

इतिहासात रमणारी ही माणसे इतिहासातील व्यक्ती, त्यांची चरित्रे याबद्दल अनावश्यक प्रमाणात हळवी असतात. इतिहासाचा अभिमान आणि दुराभिमान यांच्यातील सीमारेषा समजू न शकल्याने इतिहासाचे ओझे घेऊनच जगत असतात. इतरांच्या दृष्टीने आपण कालबाह्य आहोत, याची जाणीव असली तरी त्यांना ते मान्य नसते व 'तो काळ' आणि 'त्या काळाचे' सर्व काही कसे ग्रेट होते, हे तुणतुणे वाजवीत राहतात.

बदल हा सृष्टीचा नियम आहे, हा नियम तुम्हाला मान्य असो वा नसो तो होणारच. हे सत्य हा अट्टाहास बाळगत जगणारी ही माणसे मग व्यथित होऊन काळ ढकलतात. वर्तमानातले त्यांना काहीच पसंत नसते. त्याला नावे ठेवणे, त्यातील दोष हुडकत राहणे व वर्तमानावर फुली मारत राहणे या त्यांच्या सवयींमुळे ती लोकांना नकोशी होतात. त्यामुळे बदल स्वागतशील वृत्तीने स्वीकारत, इतिहासाचा योग्य मान ठेवत जगण्यातील मजा ही माणसे अनुभवू शकत नाहीत.

(माणसांची गर्दी या आगामी पुस्तकातून)

**प्रा.मोहन पाठक**

# परिसर वार्ता

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

रसायन शास्त्र विभागाच्या प्रा. प्रकाश यांना, माळी स्वराज्य प्रबोधन संघर्ष समितीच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श गुरू गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या कनिष्ठ स्तरातील अकरावी, पदवीधर व माहिती तंत्रज्ञान प्रथम व द्वितीय वर्षाचा निकाल अलीकडेच जाहीर झाला हा निकाल पुढील प्रमाणे आहे.

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी | द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थी | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|---|
| अकरावी | ४८३ | ४०३ | ८० | १३६ | २०८ | ८३.४३ |
| प्रथम वर्ष विज्ञान शाखा | २९१ | २२९ | ६१ | ६८ | ६५ | ७८.७ |
| द्वितीय वर्ष विज्ञान शाखा | २२० | २१४ | ०६ | ९७ | १०० | ९७.२७ |
| प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान | ६५ | ५९ | ०६ | २४ | २७ | ९०.७७ |
| द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान | ६६ | ६४ | ०२ | २५ | ३२ | ९६.९७ |

**प्रत्येक इयत्तेतील पहिले तीन विद्यार्थी**

| | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| अकरावी | अश्विथा आचार्य पुरुषोत्तम | सागर अशोक खैरनार | सिद्धेश दिलीप शिंदे |
| प्रथम वर्ष विज्ञान शाखा | अनुजा रमेश माळी | अश्विनी विलास परब | चेतना विश्वनाथ शेट्टी |
| द्वितीय विज्ञान शाखा | मिलिंद बाळकृष्ण कोकाटे | उमालक्ष्मी शिवरूद्रा बिराजदार | प्रणिता प्रकाश आदरकर |
| प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान | आमरिन शेख आसिफ | श्रद्धा सुधीर कदम | कविता महादेव बोरकर |
| द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान | हनुमंत दिलीप अनारसे | लक्ष्मी शेखर पाडवेकर | श्रुती प्रदीप प्रधान |

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीमध्ये प्रवेश घेतला आहे. तसेच द्वितीय वर्ष विज्ञान शाखेची व तृतीय वर्ष विज्ञान शाखेची विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

## विद्युत अभियांत्रिकी विभाग

**प्राचार्य डी. के. नायक यांना 'राष्ट्रीय विद्या सरस्वती पुरस्कार' प्राप्त**

प्राचार्य डी. के. नायक, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे, महाराष्ट्र राज्य यांना राष्ट्रीय विद्या सरस्वती पुरस्काराने दि. ११ एप्रिल २००७ रोजी सन्मानित करण्यात आले. सदरचा पुरस्काल त्यांना इंटरनॅशनल इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन ॲन्ड मॅनेजमेन्ट, न्यु दिल्ली या संस्थेतर्फे देण्यात आला.

पुरस्कार वितरम समारंभ हॉटेल कॅनॉट, न्यू दिल्ली येथे संपन्न झाला. पुरस्कार वितरण समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जी. व्ही. जी. कृष्णमूर्ती, माजी मुख्य निवडणूक



उजवीकडून **जी. व्ही. जी. कृष्णमूर्ती** माजी निवडणूक आयुक्त, भारत सरकार मध्यभागी **डॉ. भीष्म नारायण** सिंग माजी राज्यपाल तमीळनाडू व सोबत **डॉ. महान वीर तुली**

आयुक्त भारत सरकार, डॉ. भीष्म नारायण सिंग माजी राज्यपाल तमीळनाडू व नॉर्थ ईस्टर्न स्टेट्स व इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ॲन्ड मॅनेजमेन्ट न्यु दिल्ली या संस्थेचे चेअरमन डॉ. महान वीर तुली (IFS) इत्यादी उपस्थित होते.

सदरचा पुरस्कार प्राचार्य डी. के नायक यांना त्यांच्या तंत्रशिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल देण्यात आला आहे.

TWO DAY NATIONAL SEMINAR

ON

**Indian Philosophy: Its Relevance in the 21st Century**

On 18th & 19th January, 2008

*Venue*

Thorale Bajirao Peshawe Sabhagruha, "Jnanadweepa", Thane College Campus, Chendani Bunder Road, Thane 400 601. (MS), India.

*Organized by*

V.P.M's Joshi-Bedekar College

"Jnanadweepa", Thane College Campus, Thane 400 601. (MS), India.

Email :vpm_joshibedekar_office@yahoo.co.in nbarse@gmail.com & mensanamonographs@yahoo.co.uk

Website : www.vpmthane.org

(मुखपृष्ठावरून)

संपादकीय

## प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण

असे असतानादेखील अपेक्षित अशी उद्दिष्टे २००७ सालातील पाच महिने संपूनही आपण साध्य करु शकलेलो नाही. काम निश्चितच अवघड आहे. पण होणे गरजेचे आहे. सार्वत्रिकीकरण साध्य करण्याच्या कालमर्यादा फक्त वाढवल्या जात आहेत.

याचा परिणाम देशाच्या साक्षरतेच्या प्रमाणावर झालेला आपल्या लक्षात येतो. २००१ साली झालेल्या जनगणनेनुसार ३५%लोक अद्याप निरक्षर आहेत. याचा अर्थ खेडी, दुर्गम भाग आणि वंचित गटांतील समाजाचा मोठा भाग शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकलेला नाही, असा होतो. वास्तविक आकड्यांचेच हिशेब पहावयाचे झाले तर देशात सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे प्रमाणही वाढले आहे. एकूण शिक्षण संस्था ६.९ लाख आहेत व या संस्थांच्या ७३% (म्हणजे सुमारे ५.४ लाख) प्राथमिक शाळा आहेत. १९५०-५१ साली सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांची संख्या २.८ कोटी होती. ३०-३२ वर्षांत म्हणजे ८२-८३ साली ती ११.४ कोटी झाली. (लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणाच्या संदर्भात या संख्यांमधील अर्थ तपासायला हवा)

ही सर्व प्रगती आहे, वाढ आहे की सूज? कारण पटनोंदणी वाढल्याचे समाधान व्यक्त करता करता दुसरीकडे गळती आणि अनुपस्थितीचे प्रमाण यांची समस्या तीव्र झाल्याचे लक्षात येते. त्याचा अर्थ प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा वेग आपण वाढवू शकत नाही, असा होतो.

सार्वत्रिकीकरण २००० सालापर्यंत होऊ शकते नाही व सध्याचे उद्दिष्ट २०१० आहे. यामागील कारणांच्या यादा फार मोठ्या आहेत. अनेक शाळांमध्ये फळे, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, शिक्षक अशा पायाभूत सोयीही नाहीत. या आणि असे 'नाही' चे सदर भरणाऱ्या अनेक बाबी आहेत. पण महत्त्वाचा अभाव आहे, तो जागतिकीकरणाच्या प्रवाहाशी एकरुप होण्याचा. महात्मा गांधीच्या मूलद्योगी शिक्षण विचारांत, कोठारी आयोगासह अनेक आयोग व समित्यांत सांगितली गेलेली जीवनाशी असणारी सांगड घालण्याची मानसिकता नाही. आजही शिक्षणतज्ज्ञ हे आवर्जून सांगताहेत. पण उत्पादकतेशी सांगड असणारे हे शिक्षण, व्यवसायाभिमुख शिक्षण हा विचार हळू हळू रूजताना दिसत आहे. पदव्यांसाठी होणाऱ्या पुस्तकी संशोधनाचे पाय त्याकरता जमिनीला लावावे लागतील. साठ वर्षांनंतरही प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे स्वप्न रहावे, हा इतिहास व्हावा यासाठी अथक प्रयत्नांची व पायाभूत प्रयत्नांची गरज आहे. समाजातल्या प्रत्येकानेच त्या संदर्भात स्वत:ला प्रश्न विचारावेत व काळाप्रमाणे बदलावे!

❑❑❑